दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३३१ I सोमवार १४ सप्टेंबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



**तयारी बाप्पांच्या स्वागताची....**
छत्रपती संभाजीनगर : यंदाचा गणेशोत्सव डीजेमुक्त करण्याचा निर्धार प्रशासनाने घेतल्याने पारंपारिक वाद्य, ढोल पथकांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे... विविध ढोल पथकांनी बाप्पांच्या स्वागताची जय्यत तयारी चालवली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील मृत्युंजय ढोलपथकाची जय्यत तयारी सुरू असताना घेतलेले छायाचित्र...

# २०२९ पूर्वी समान नागरी कायदा!

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची घोषणा, नागरिकत्व पडताळणी करण्यासाठी मित्र पक्षांशी चर्चा सुरू

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** देशातील भाजपशासित किंवा मित्र पक्षांची सत्ता असलेल्या २१ राज्यांमध्ये २०२९ पूर्वी समान नागरी कायदा लागू केली जाईल, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी जाहीर केले. राष्ट्रीय नागरिकत्व पडताळणी (नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन) देशभर करण्याबाबत राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्ष तसेच विविध संघटनांशी सध्या चर्चा केली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

देशात समान नागरी कायदा लागू करण्याचे आश्वासन भाजपने आपल्या जाहीरनाम्यात दिले आहे. यानुसार भाजप किंवा मित्र पक्षांची सरकारे असलेल्या सर्व २१ राज्यांमध्ये समान नागरी कायदा पुढील लोकसभा निवडणुकीपूर्वी म्हणजेच २०२९ पर्यंत लागू होईल, असे शहा यांनी पत्रकार परिषेदत सांगितले. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री ते पंतप्रधान या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या कारकीर्दीच्या सन्मनासाठी देशभरात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात देशभर सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी पत्रकार परिषदेत केली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीत घेतलेल्या निर्णयांचा लेखाजोखा शहा यांनी मांडला. . देशात कधीही झाले नसते असे मुस्लिम समाजातील ' तिहेरी तलाक ' रूढीविरोधातील कायदा, कश्मीरमधील ३७० आणि ३५ (अ) कलम हटविण्याचा निर्णय तसेच नक्षलवादविरोधी कारवाई, आणि ईशान्य भारतातील शांतता करार हे महत्त्वाचे निर्णय पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळात झाले. दहशतवादाविरोधातील यापूर्वी मुळमुळीत धोरण सरकारकचे होते. मोदी सरकाच्या काळात दहशतवादी कारवाया करणऱ्यांना जशास तसे उत्तर देण्यात आले. त्यासाठी त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' चा दाखला दिला.

देशातील घुसखोरीच्या प्रश्नावर बोलताना अमित शहा यांनी देशातील अवैध घुसखोरांना हद्दपार करण्याबाबत सरकारची भूमिका ठाम आहे. देशातील एक एक घुसखोर शोधून त्याला देशाबाहेर काढू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. 'राष्ट्रीय नागरिकत्व पडताळणी ' (एनआरसी) मोहिमेबाबत बोलताना मात्र त्यांनी या मोहिमेची निश्चित कालमर्यादा जाहीर केली नाही. याबाबत राज्य सरकारांसोबत समन्वयाने निर्णय घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. मणिपूरमध्ये जनगणना पुढे ढकलून राष्ट्रीय नागरिकत्व पडताळणी मोहिम राबवावी, अशी स्थानिक पातळीवर मागणी असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले. सुशासन सेवा संकल्प' या उपक्रमातून पंचायत सदस्यांपासून नगरसेवक आणि अन्य लोकप्रतिनिधींचा सहभाग घेतला जाणार आहे. देशाच्या चार भागांत विशेष महाकुंभांचे आयोजनही करण्यात येणार असल्याची माहिती अमित शहा यांनी दिली.



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज मुंबईत ५२ वा इंडिया जेम्स अँड ज्वेलरी अवॉर्ड्स प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.

- २०१४ पूर्वी देशाचे राजकारण भ्रष्टाचार, जातिवाद आणि परिवारवाद या तीन बाबींनी ग्रासले होते. २०१४ नंतर देशात विकासाभिमुख राजकारण सुरू झाले. या तीन बाबींचे उच्चाटन झाल्याने गेल्या १२ वर्षांत देशाने अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण, राष्ट्रीय सुरक्षा, पायाभूत सुविधा आणि गरिबी कल्याणाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केल्याचे सांगताना देशातील २५ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर आल्याचा दावा त्यांनी केला.

# बाप्पांच्या आगमनाच्या पूर्वसंध्येला अहिल्यानगरात पावसाची हजेरी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** तब्बल दीड महिन्याच्या पावसाच्या खंडानंतर अहिल्यानगर शहरासह परिसरात रविवारी (दि. १३) सायंकाळी हलक्या सरींनी हजेरी लावली. अधूनमधून पावसाचा जोर वाढत असल्याने श्रींच्या आगमनाच्या पूर्वसंध्येला वरुणराजानेही हजेरी लावल्याचे चित्र शहरात पाहायला मिळाले. पावसामुळे बळीराजाच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.



**शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित**

आज, सोमवारी (दि. १४) घरोघरी तसेच सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये श्री गणेशाची प्रतिष्ठापना होणार आहे. बाप्पाच्या स्वागतासाठी अहिल्यानगर शहर सज्ज झाले असून, बाजारपेठेत गणेशोत्सवाची लगबग वाढली आहे. सजावटीचे साहित्य, विद्युत रोषणाई आणि विविध वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांची गर्दी होत आहे. ठिकठिकाणी गणेशमूर्तींचे स्टॉलही सजले आहेत. पावसाची रिपरिप सुरू असतानाही खरेदीसाठी नागरिकांचा उत्साह कायम असल्याचे दिसून आले.

दरम्यान, पावसाने प्रदीर्घ दडी मारल्याने जिल्ह्यातील खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी पिकांनी माना टाकल्या असून, पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेला पाऊस वेळेत न झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत. पशुधनासाठी चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जिल्ह्यातील काही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सुरुवातीच्या काळात चांगला पाऊस झाल्याने पाणीसाठा निर्माण झाला. मात्र, लाभक्षेत्रात पावसाने ओढ दिल्याने धरणे भरली; पण शेतीसाठी आवश्यक पाऊसच कमी पडला, अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आता झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यात पुन्हा पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. पुढील दोन दिवस पावसाचा जोर राहण्याचा अंदाज असून, उत्तर महाराष्ट्रासाठी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष आता आकाशाकडे लागले आहे. गणरायाच्या आगमनासोबतच जिल्ह्यात समाधानकारक पावसाचेही आगमन व्हावे, अशीच बळीराजाची अपेक्षा आहे.

## महत्त्वाचे..

### पिकांच्या नुकसानीचे सर्वेक्षण करण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचना

नागपूर : राज्यातील पावसाच्या कमतरतेमुळे पिकांचे नुकसान झालेल्या भागांचे तातडीने सर्वेक्षण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभाग संयुक्तपणे हे सर्वेक्षण करणार असून, सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार शेतकऱ्यांना आवश्यक ती नुकसानभरपाई देण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना बावनकुळे म्हणाले की, पावसाने दडी मारल्यामुळे अनेक भागांतील पिके करपली आहेत. अशा नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून नुकसानीचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या यंत्रणांकडून संयुक्तपणे हे काम केले जाईल. सर्वेक्षणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या नियमांनुसार शेतकऱ्यांना मदत देण्याची कार्यवाही करण्यात येईल. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन आवश्यक ती कार्यवाही करीत असल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# भाजपच्या माजी नगरसेवक स्वप्निल शिंदेसह चौघांवर 'मोक्का'

- १४ कोटी ६६ लाखांच्या जमीन फसवणूक प्रकरण
- नाशिक परिक्षेत्राच्या पोलिस महानिरीक्षकांची मंजुरी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सावेडी येथील एका नामांकित डॉक्टरांना जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात जाळ्यात ओढून बनावट कागदपत्रे, खोटे जमीनमालक आणि बोगस सह्यांच्या आधारे तब्बल १४ कोटी ६६ लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी कठोर पाऊल उचलले आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार व भाजपचे माजी नगरसेवक स्वप्निल रोहिदास शिंदे याच्यासह चौघांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार (मोक्का) कारवाई करण्यात आली आहे.

मोक्का कारवाई झालेल्या आरोपींमध्ये स्वप्निल रोहिदास शिंदे (रा. सावेडी, अहिल्यानगर), अमोल बबन जाधव (रा. मोरगव्हाण, ता. नेवासे), महेश नारायण कुहे आणि भारत फुलमाळी (रा. घोडेगाव, ता. नेवासे) यांचा समावेश आहे. नाशिक परिक्षेत्राच्या पोलिस महानिरीक्षकांनी मोक्काच्या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी दिल्याने जमीन व्यवहारातील फसवणुकीच्या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे.



झोपडी कॅन्टीन परिसरातील डॉ. अनिल सूर्यभान आठरे यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात ८ नोव्हेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींनी सुरुवातीला डॉक्टरांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर विविध जमिनी दाखवून खरेदी-विक्रीच्या व्यवहाराचे आमिष दाखवले. प्रत्यक्ष व्यवहाराच्या वेळी बनावट जमीनमालक उभे करून त्यांच्या बोगस सह्या तसेच बनावट दस्तऐवज तयार करण्यात आले, असा पोलिसांचा आरोप आहे. या कागदपत्रांच्या आधारे वेळोवेळी कोट्यवधी रुपयांची रक्कम उकळण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला. आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक डॉ. शरद गोर्डे यांनी तपासाला गती देत मुख्य संशयित अमोल जाधव याला अटक केली. (पान ४ वर)

**स्वप्निल शिंदेवर 'डबल मोक्का'**

दरम्यान, स्वप्निल शिंदे याच्या टोळीवर यापूर्वी खूनाच्या गुन्ह्यातही मोक्का कारवाई करण्यात आली होती. आता कोट्यवधी रुपयांच्या जमीन फसवणूक प्रकरणात पुन्हा मोक्का लागल्याने त्याच्या अडचणी वाढल्या आहेत. त्याच्यावर व त्याच्या साथीदारांवर यापूर्वीही मारामारी, दहशत निर्माण करणे आणि बेकायदेशीर जमाव जमविणे यांसारखे विविध गंभीर गुन्हे तोफखाना व इतर पोलिस ठाण्यांत दाखल असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. जुलै २०२३ मध्ये सावेडी येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते अंकुश दत्तात्रय चत्तर यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. या हत्या प्रकरणात स्वप्निल शिंदे याला मुख्य आरोपी म्हणून अटक करण्यात आली होती. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलिसांनी शिंदे व त्याच्या टोळीवर संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यानुसार मोक्का कारवाई केली होती.



# बोराडे खून प्रकरणाचा पर्दाफाश

## टाकळीमियाँच्या प्रसाद अडगळेला अटक: गुन्ह्यात तीन अल्पवयीन मुलांचा समावेश

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील खर्डा येथिल जातेगाव फाटा याठिकाणी कोयत्याने वार करून करण्यात आलेल्या निर्घृण खुनाचा गुन्हा उघडकीस आणण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी एका सज्ञान आरोपीसह तीन विधिसंघर्षग्रस्त (अल्पवयीन) बालकांना ताब्यात घेतले आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, ११ सप्टेंबर २०२६ रोजी तान्हाजी भास्कर बोराडे (रा. माळेवाडी, ता. भूम, जि. धाराशिव) हे खर्डा (ता. जामखेड) येथे असताना मोटारसायकलवरून आलेल्या अनोळखी इसमांनी त्यांच्या डोळ्यात मिरची पावडर टाकली. त्यानंतर त्यांच्या डोक्यात कोयत्याने गंभीर वार करून त्यांची निर्घृण हत्या केली. याप्रकरणी खर्डा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १५८/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ३(५) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

खर्डा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या या न उघडकीस आलेल्या गुन्ह्याची गंभीर दखल घेत अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपास करून आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव, पोलीस अंमलदार शाहीद शेख, अभिजीत अरकल, श्यामसुंदर जाधव, भाऊसाहेब काळे, अमोल आजबे, अजिनाथ पाखरे, रमीजराजा अत्तार, अरूण मोरे, फुरकान शेख आणि प्रशांत राठोड यांच्या पथकाची स्थापना करून त्यांना तपासासाठी रवाना करण्यात आले. तपास पथकाने तात्काळ घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. गोपनीय बातमीदार आणि तांत्रिक (पान ४ वर)

# 'बी-हेवी' मळीवरील निर्बंधाने साखर उद्योगासमोर आर्थिक संकटाची भीती

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**जालना :** इथेनॉल उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या 'बी-हेवी' मळीवर निर्बंध घालण्याचा केंद्र सरकारचा विचार सुरू असल्याचा आरोप माजी मंत्री तथा राज्य सहकारी साखर संघाचे संचालक राजेश टोपे यांनी केला.

या निर्णयामुळे इथेनॉल उत्पादन घटून त्यासाठी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केलेले साखर कारखाने आर्थिक अडचणीत येण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.जालना येथे माध्यम प्रतिनिधींशी बोलताना टोपे म्हणाले की, केंद्र सरकारच्या 'ई-२०' धोरणाला सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक करून इथेनॉल प्रकल्प उभारले आहेत. आगामी २०२६-२७च्या गाळप हंगामात या आसवनींसमोर उत्पादनाबरोबरच आर्थिक अडचणींचा मोठा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे दर वाढल्याने ते नियंत्रणात ठेवण्यासाठी थेट उसाचा रस आणि 'बी-हेवी' मळीपासून इथेनॉल निर्मितीवर निर्बंध घालण्याचा केंद्राचा विचार असल्याचे टोपे यांनी सांगितले. 'बी-हेवी' मळीत साखरेचे प्रमाण तुलनेने अधिक असल्याने त्यापासून इथेनॉलचे उत्पादनही जास्त होते. त्याचबरोबर प्रकल्पांसाठी घेतलेली कोट्यवधी रुपयांची कर्जे फेडायची कशी, असा प्रश्न कारखान्यांसमोर उभा राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले. 'बी-हेवी'ऐवजी 'सी-हेवी' मळीपासून इथेनॉल तयार करणे साखर कारखान्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसल्याचेही टोपे यांनी सांगितले. राज्यातील १७९ आसवनींपैकी १४३ साखर किंवा मळीवर, तर ३६ धान्यावर आधारित आहेत. साखर उद्योगावर आधारित आसवनींमध्ये सुमारे १६ ते २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाल्याचा दावा त्यांनी केला. आगामी हंगामात राज्यात सुमारे १ हजार ४५ लाख टन ऊस गाळप होण्याची शक्यता असून, त्यातून सुमारे ४२ लाख टन 'सी-हेवी' मळी तयार होईल. मात्र, त्यापासून अपेक्षित इथेनॉल उत्पादन मर्यादित राहणार असल्याने केंद्र सरकारने निर्बंध लावण्यापूर्वी साखर उद्योगाच्या आर्थिक परिणामांचा गांभीर्याने विचार करावा, अशी अपेक्षा टोपे यांनी व्यक्त केली.

# पाथर्डीत डीजेच्या स्टेटसवरून दोन गटांत हाणामारी; ५३ जणांवर गुन्हा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** सण-उत्सवांच्या काळात डीजे व डॉल्बीच्या कर्णकर्कश आवाजाचा मुद्दा चर्चेत असतानाच पाथर्डी तालुक्यात डीजेच्या सोशल मीडिया स्टेटसवरून दोन गटांत वाद होऊन हाणामारी झाल्याची घटना समोर आली आहे. सोमठाणे नलवडे येथे घडलेल्या या प्रकरणी दोन्ही गटांनी परस्परविरोधी फिर्यादी दाखल केल्या असून, एकूण ५३ जणांसह काही अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपींमध्ये आठ महिलांचाही समावेश आहे.

पोळा सणाच्या दिवशी गावात डीजे लावून मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीचे काही जणांनी सोशल मीडियावर स्टेटस ठेवले. यावरून दोन गटांत वाद निर्माण झाला. त्यानंतर गावातील मंदिराजवळ तसेच झोपडपट्टी परिसरातील रस्त्यावर दोन्ही गट आमनेसामने आले. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले.

यापरकरणी रामदास शंकर काकडे यांच्या फिर्यादीवरून २६ जणांविरुद्ध, तर सुनील विनायक दौंडी यांच्या फिर्यादीवरून २७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हाणामारीदरम्यान लाकडी दांडके व लोखंडी गजाचा वापर करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाने गणेशोत्सव, गणेश विसर्जन, घटस्थापना व दसरा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिरवणुकांमध्ये डॉल्बी व उच्च आवाजाच्या ध्वनीवर्धकांवर बंदी घातली आहे. त्यामुळे उत्सवाच्या काळात ध्वनिप्रदूषणासोबतच सोशल मीडियावरील डीजे स्टेटसही वादाचे कारण ठरत असल्याचे या घटनेतून दिसून आले आहे.

**४९२ जण दोन दिवस हद्दपार**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. कोतवाली, तोफखाना व कॅम्प या तीन पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील सुमारे ४९२ जणांवर दोन दिवसांकरिता हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. तर, रेकॉर्डवरील ६०८ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. यंदा पहिल्यांदाच श्री गणेश स्थापन दिन आणि विसर्जन दिनी ४९२ जण शहरातून हद्दपार राहणार आहेत. त्यांना नोटिसा बजविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हद्दपार केल्यानंतर पोलिसांचा त्यांच्यावर वॉच राहणार आहे.

# ‘ब्रिक्स’च्या व्यासपीठावर भारताची वाढती मुत्सद्देगिरी

जागतिक सत्तासमीकरणे झपाट्याने बदलत असताना भारताच्या नेतृत्वाखाली पार पडलेली १८ वी ब्रिक्स शिखर परिषद ही केवळ आर्थिक सहकार्याची बैठक न राहता बदलत्या जगाला दिशा देणाऱ्या महत्त्वाच्या व्यासपीठात रूपांतरित झाल्याचे दिसते. जागतिक राजकारणातील तणाव, पश्चिम आशियातील संघर्ष, दहशतवाद, व्यापारातील संरक्षणवाद, डॉलरवरील अवलंबित्व, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ‘ग्लोबल साउथ’चे प्रतिनिधित्व अशा विविध विषयांवर झालेली चर्चा भारताची वाढती राजनैतिक भूमिका अधोरेखित करणारी आहे. ‘नवी दिल्ली घोषणापत्रा’च्या माध्यमातून सदस्य देशांनी अनेक प्रश्नांवर सामायिक भूमिका मांडली, ही या परिषदेची महत्त्वाची फलश्रुती मानावी लागेल.

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

ब्रिक्स ही सुरुवातीला उदयोन्मुख अर्थव्यवस्थांची आर्थिक सहकार्याची संकल्पना होती. मात्र, आज तिचे स्वरूप व्यापक झाले आहे. जागतिक व्यापार, ऊर्जा, तंत्रज्ञान, सुरक्षा, हवामान बदल आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सुधारणांपर्यंत या संघटनेचा प्रभाव पोहोचत आहे. त्यामुळे भारताला ब्रिक्सचे अध्यक्षपद मिळणे आणि राजधानी दिल्लीत शिखर परिषद आयोजित करणे हे देशाच्या परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. त्याहून महत्त्वाचे म्हणजे परस्परविरोधी हितसंबंध असलेल्या देशांना एकाच टेबलावर आणून संवादाचा मार्ग खुला ठेवण्याची भारताची क्षमता या परिषदेत दिसून आली.

इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या पश्चिम आशियातील महत्त्वाच्या देशांची एकाच व्यासपीठावर उपस्थिती विशेष लक्षवेधी आहे. या देशांमधील संबंधांमध्ये तणावाचे विविध पदर आहेत. अशा परिस्थितीत संवादासाठी समान व्यासपीठ निर्माण होणे ही स्वतःमध्ये सकारात्मक बाब आहे. पश्चिम आशियातील संघर्ष चिघळत असताना युद्धाच्या ऐवजी संयम, संवाद आणि राजनैतिक मार्गाचा आग्रह धरणे ही आजच्या जगाची गरज आहे. भारताने या भूमिकेला प्राधान्य दिले, हे त्याच्या संतुलित परराष्ट्र धोरणाचे लक्षण म्हणावे लागेल.दहशतवादाचा मुद्दा भारतासाठी नेहमीच अत्यंत संवेदनशील राहिला आहे. सीमापार दहशतवादाचा अनुभव असलेल्या भारताने ब्रिक्सच्या व्यासपीठावर दहशतवादाविरोधात कठोर भूमिका मांडणे स्वाभाविक आहे. दहशतवादी संघटनांना मिळणारा निधी, सुरक्षित आश्रय आणि त्यांना मिळणारे अप्रत्यक्ष पाठबळ यावर आंतरराष्ट्रीय पातळीवर ठोस कारवाई झाली पाहिजे. दहशतवादाचा चांगला आणि वाईट असा भेद न करता त्याविरोधात एकसंध भूमिका असणे आवश्यक आहे. भारताने हा मुद्दा जागतिक अजेंड्यावर सातत्याने ठेवला आहे.

भारत–चीन संबंधांचाही या परिषदेच्या निमित्ताने विशेष उल्लेख करावा लागेल. सीमा प्रश्नामुळे दोन्ही देशांमध्ये निर्माण झालेला तणाव हा केवळ द्विपक्षीय संबंधांपुरता मर्यादित नसून आशियाच्या स्थैर्याशी जोडलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यातील चर्चा ही त्यामुळे महत्त्वाची ठरते. सीमा शांत राहणे, व्यापार वाढणे आणि मतभेद संवादातून सोडविणे हे दोन्ही देशांच्या हिताचे आहे. मात्र, संवाद आणि सावधगिरी यांचा समतोल राखणेही तितकेच आवश्यक आहे. रशिया–युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताची भूमिका पुन्हा एकदा जगाचे लक्ष वेधून घेणारी आहे. भारताने कोणत्याही एका गटाची अंधपणे बाजू न घेता संवाद आणि शांततेचा आग्रह धरला आहे. रशियाशी भारताचे पारंपरिक संबंध आहेत, तर पाश्चिमात्य देशांशीही भारताचे आर्थिक आणि सामरिक संबंध विस्तारत आहेत. या दोन्ही बाजू सांभाळत राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची भारताची मुत्सद्देगिरी ब्रिक्ससारख्या व्यासपीठावर अधिक प्रभावीपणे पुढे येते.व्यापाराच्या क्षेत्रात एकतर्फी निर्बंध आणि टॅरिफच्या विरोधातील भूमिका हीदेखील महत्त्वाची आहे. अशा परिस्थितीत मुक्त, न्याय्य आणि संतुलित व्यापारव्यवस्थेची मागणी योग्यच आहे. स्थानिक चलनांमधील व्यवहार आणि पर्यायी पेमेंट प्रणालीबाबतचे प्रयत्न हे डॉलरवरील अतिअवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल मानता येईल.‘ग्लोबल साउथ’चा आवाज बुलंद करणे हा भारताच्या ब्रिक्स अध्यक्षतेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील विकसनशील देशांच्या समस्या आणि अपेक्षा जागतिक निर्णयप्रक्रियेत पुरेशा प्रमाणात प्रतिबिंबित होत नाहीत. संयुक्त राष्ट्रांसह आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सुधारणा आणि अधिक न्याय्य प्रतिनिधित्वाची मागणी म्हणूनच महत्त्वाची ठरते. भारताचा संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी सदस्यत्वाचा दावा याच व्यापक भूमिकेशी जोडलेला आहे.भविष्यातील अर्थव्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांचे महत्त्व प्रचंड असणार आहे. त्यामुळे ब्रिक्सच्या ‘ब्रिक्स’च्या व्यासपीठावर भारताची वाढती मुत्सद्देगिरीअजेंड्यावर एआय, डिजिटल शेती, आरोग्य, एमएसएमई, कौशल्यविकास आणि पायाभूत सुविधा यांसारख्या विषयांना स्थान मिळणे स्वागतार्ह आहे. विशेषतः डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर कृषी क्षेत्रात केल्यास विकसनशील देशांच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळू शकते.

# मातीच्या गणरायातून पर्यावरण संवर्धनाचा जागर!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव रुजविण्यासोबतच त्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने महात्मा गांधी संकुलात पर्यावरणपूरक गणपती मूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देशी माती व नैसर्गिक साहित्याचा कल्पकतेने वापर करून विविध आकर्षक गणेशमूर्ती साकारत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा प्रभावी संदेश दिला.




गणेशमूर्ती निर्मितीच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्वतःच्या हाताने मातीला आकार देताना विद्यार्थ्यांनी कलाकौशल्य, कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा सुरेख मिलाफ साधला. पर्यावरणाला हानी पोहोचविणाऱ्या घटकांऐवजी नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्याचे महत्त्व यावेळी विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

शालेय वयातच पर्यावरण रक्षणाचे संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. तयार केलेल्या गणेशमूर्ती विद्यार्थ्यांनी उत्साहाने सादर केल्या. त्यामुळे त्यांच्या कलागुणांना चालना मिळण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याची सकारात्मक भावना निर्माण झाली.

या उपक्रमासाठी संकुलाचे प्राचार्य दिलीप डहाळे, मुख्याध्यापिका नलिनी जाधव, उपप्राचार्य संजय दुबे, पर्यवेक्षिका संगीता सांगळे, विभागप्रमुख डॉ. शरद दुधाट यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ शिक्षक संजय ठाकरे, माधुरी वडघुले, संगीता उगले, प्रफुल्ल नव्हाळे, विजयश्री कदम, सुजाता ठाकरे, नंदादेवी बैसाणे, कमल थिटे, दीपिका आंबेकर, शैलजा सातपुते, प्रमिला पंडोरे, सुवर्णा भोसले आदींनी विशेष परिश्रम घेतले.उपक्रमाचे नियोजन सहशालेय उपक्रम प्रमुख विलास गभाले, संपत बगाड व पल्लवी कुंदळ यांनी केले. कला शिक्षिका मीनाक्षी गांगुर्डे यांनी विद्यार्थ्यांना मूर्ती निर्मितीसाठी कलात्मक मार्गदर्शन केले.

# ‘याची देही याची डोळा’ अनुभवला साई संकल्पपूर्ती यात्रेचा सोहळा

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** साई नगरी शिर्डीतून साई निर्माण ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेली भव्य ‘संकल्पपूर्ती तीर्थयात्रा’ नुकतीच भक्तीमय वातावरणात शिर्डीत परतली. सुमारे १५०० साईभक्तांनी सहभाग घेतलेल्या या यात्रेत काशी, अयोध्या तसेच नेपाळमधील पशुपतिनाथ आणि मनकामना मंदिराचे दर्शन घेण्यात आले. श्रद्धा, नियोजन आणि उत्स्फूर्त सहभागामुळे ही यात्रा भाविकांसाठी अविस्मरणीय ठरली.

यात्रेच्या प्रारंभी काशी विश्वनाथ मंदिरात भाविकांनी दर्शन घेत ‘हर हर महादेव’चा जयघोष केला. त्यानंतर अयोध्येतील श्रीराम मंदिरात राम ललाचे दर्शन घेण्याचा भावनिक आणि ऐतिहासिक अनुभव भाविकांनी घेतला. भारत–नेपाळ सीमा पार करून यात्रेकरूंनी पशुपतिनाथ व मनकामना मंदिराचे दर्शन घेतले.

नेपाळमध्ये झालेल्या महाप्रलयानंतर तेथील डोंगर–दऱ्यांमधील बिकट रस्त्यामुळे यात्रेकरूंच्या मनात भीती निर्माण झाली होती. काठमांडूहून मनकामनाकडे जाणारा मार्ग पाहून काही भाविकांनी माघारी परतण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र, विजयराव कोते



यांनी ‘नेपाळ दौरा होणारच!’ अशी ठाम भूमिका घेत भाविकांना धीर दिला. त्यांच्या खंबीर नेतृत्वामुळे यात्रेकरूंमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

१५०० भाविकांच्या निवास, भोजन, प्रवास आणि मार्गदर्शनाची व्यवस्था साई निर्माण ग्रुपच्या नियोजनबद्ध व्यवस्थापनातून करण्यात आली. साईबाबांवरील श्रद्धा, कोते यांचे नेतृत्व आणि सर्वांच्या सहकार्यामुळे ही यात्रा निर्विघ्नपणे पूर्ण झाली. ‘श्रद्धा आणि सबुरी असेल तर अशक्य काहीच नाही’, याची प्रचिती या यात्रेने दिली असून, हा सोहळा शिर्डीच्या इतिहासात संस्मरणीय ठरल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली.

# ध्येय गाठण्यासाठी आत्मविश्वासासोबत कठोर परिश्रम गरजेचे : चैतालीताई काळे

**कोळपेवाडी** : जीवनात यशस्वी होण्यासाठी आणि इच्छित ध्येय गाठण्यासाठी आत्मविश्वासासोबत कठोर परिश्रम, चिकाटी व शिस्त आवश्यक आहे. ग्रामीण भागातील मुलींमध्ये प्रचंड गुणवत्ता व क्षमता असून, त्यांनी नकारात्मक विचार न करता आत्मविश्वासाने पुढे जावे, असा सल्ला जिल्हा बँकेच्या माजी संचालिका चैतालीताई काळे यांनी दिला.

सुरेगाव–कोळपेवाडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रांतर्गत मैदानी व लेखी परीक्षा प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ चैतालीताई काळे यांच्या हस्ते झाला. यावेळी विद्यार्थिनींशी



संवाद साधताना त्या बोलत होत्या.

ग्रामीण भागातील मुलींनी कोणत्याही परिस्थितीत खचून न जाता कठोर मेहनत व चिकाटीच्या जोरावर आपली स्वप्ने पूर्ण करावीत. पोलीस व शासकीय सेवेत भरती होऊन देशसेवा करण्याची संधी अभिमानास्पद असून, मुलींनी या संधीचे सोने करावे, असे आवाहन त्यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेने ग्रामीण विद्यार्थिनींच्या शिक्षणाला व सर्वांगीण विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. योग्य मार्गदर्शनाअभावी ग्रामीण मुली पोलीस भरतीपासून दूर राहू नयेत, यासाठी सुरू करण्यात आलेली ही अकॅडमी त्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच समाजमाध्यमांचा वापर दिखाव्यासाठी न करता ज्ञान, व्यक्तिमत्त्व विकास व करिअरसाठी करावा, असेही त्यांनी सांगितले.

या प्रसंगी छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या १९९८च्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांच्या वतीने व डॉ. दत्तात्रय कोळपे यांच्या प्रयत्नातून प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनींना गणवेशाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्या नीता केदार, कचरू कोळपे, अशोकराव भगत, दिनकर वाकचौरे, बाळासाहेब ढोमसे, अविनाश काळे, किरण चांदगुडे, विक्रम कुलकर्णी, सुरेखा मेहेरखांब, रोहिणी आभाळे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# शिर्डी विकास सोसायटीची वार्षिक सभा खेळीमेळीत

## स्वतःच्या मालकीचे सुसज्ज कॉम्प्लेक्स उभारण्याची मागणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** येथील शिर्डी विकास सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेला सभासद व संचालक मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक कैलास बापू कोते अध्यक्षस्थानी होते.

यंदाच्या सभेत केवळ अधिकृत सभासदांनाच प्रवेश देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतल्याने सभेतील अनावश्यक गर्दी टळली. त्यामुळे कामकाज शिस्तबद्ध व शांततामय वातावरणात पार पडले. या निर्णयाचे सभासदांनी स्वागत केले.सभेच्या प्रारंभी सचिव संदीप बढे यांनी विषयपत्रिकेवरील विषयांचे वाचन केले. त्यास सभासदांनी सर्वानुमते मंजुरी दिली. यावेळी संस्थेच्या प्रगतीचा आढावाही सादर करण्यात आला. उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी भाषणातून संस्थेच्या भविष्यातील वाटचालीबाबत भूमिका मांडली. शिर्डी विकास सोसायटी ही शेतकऱ्यांच्या कष्टातून उभी राहिलेली संस्था असून, संस्थेने स्वतःच्या मालकीचे टोलेजंग व सुसज्ज कॉम्प्लेक्स उभारावे, अशी मागणी त्यांनी अध्यक्ष व संचालक मंडळाकडे केली. स्वतःची वास्तू झाल्यास संस्थेचा लौकिक जिल्ह्यात वाढेल आणि सभासदांनाही अभिमान वाटेल, असे त्यांनी सांगितले.दरम्यान, संस्थेच्या कामकाजावर टीका करणाऱ्यांवरही शेळके यांनी निशाणा साधला. काही जण प्रसिद्धीसाठी सचिव संदीप बढे यांच्याविरोधात विनाकारण आरोप करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. सभासदांनी अशा प्रकारांपासून सावध राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात कैलास बापू कोते यांनी सभासदांचे आभार मानून संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकदिलाने काम करण्याचे आवाहन केले.

नानासाहेब शिंदे पोलीस संरक्षणात सभासद नानासाहेब शिंदे हे पोलीस संरक्षणात सभेला दाखल झाल्याने उपस्थितांमध्ये हा चर्चेचा विषय ठरला. संस्थेच्या मालकीचे गाळे सभासदांच्या परिवारातील सदस्यांना देण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली होती.

या मुद्द्यावर सभेत खडाजंगी होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांनी शिर्डी पोलीस ठाण्यात संरक्षणाची मागणी केली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक गलांडे यांनी त्यांना पोलीस संरक्षण उपलब्ध करून दिले. त्यामुळे शिंदे यांचे पोलीस बंदोबस्तातील आगमन सभेत चर्चेचा विषय ठरले.

# विद्यार्थी व शिक्षकांतील समन्वयातूनच शाळेची प्रगती : संध्या गायकवाड



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शाळा, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील समन्वय जितका मजबूत असेल, तितकी शाळेची शैक्षणिक व सर्वांगीण प्रगती अधिक वेगाने होते. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसोबतच त्यांच्यातील कलागुण, कौशल्ये आणि आत्मविश्वास विकसित करण्यासाठी शिक्षकांनी सातत्याने प्रयत्नशील राहिले पाहिजे असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी केले.

राहुरी तालुक्यातील तांदुळवाडी येथील अष्टविनायक इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजला संध्या गायकवाड यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी राष्ट्रीय पातळीवर आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रिन्सिपल मोहिनीराज होन यांच्या हस्ते शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना गायकवाड म्हणाल्या, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान पुरेसे नाही. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देतानाच त्यांच्यामध्ये संस्कार, सामाजिक जाणीव, शिस्त आणि जबाबदारीची भावना निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी शाळेतील प्रत्येक घटकाने एक टीम म्हणून काम केले पाहिजे. शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचा सहभाग यांचा सुंदर संगम झाला, तर कोणतीही शाळा निश्चितपणे प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू शकते.अष्टविनायक इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील शैक्षणिक वातावरण, शिक्षकांचे कार्य आणि विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे उपक्रम याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. शाळेने भविष्यातही गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य द्यावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.यावेळी प्राचार्य मोहिनीराज होन, पर्यवेक्षक पुष्पराणी स्वामी, जयश्री इंचलकर, मयूर फडतरे, स्वप्नाली शिरसाट, दत्तात्रय लांघे, गोरक्षनाथ होन, रूपाली पाटील, शीतल बोरसे, मिनाज शेख, सुनंदा ससाणे, सुवर्णा मोरे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# श्री श्री रविशंकरजींना नेवासाच्या पैस खांब दर्शनाचे निमंत्रण

## देविदास महाराज म्हस्के यांनी घेतली भेट

नेवासाः बंगलोर येथे नेवासा येथील वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रमुख श्री श्री रविशंकरजी महाराजांची भेट घेतली यावेळी त्यांनी नेवासा तीर्थक्षेत्र महिमा कथन करत त्यांना माऊलींच्या पैस खांब दर्शनासाठी नेवासा येथे येण्याचे निमंत्रण दिले.

संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख गुरुवर्य वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांना श्री श्री रविशंकर महाराजांच्या ७० व्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे व बंगलोर येथील त्यांच्या आश्रमाला ४५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल निमंत्रण देण्यात आले होते त्यानुसार वेदांताचार्य देविदास महाराजांनी बंगलोर येथे जाऊन रविशंकर महाराजांची भेट घेतली

यावेळी श्री श्री रविशंकरजी महाराजांचा ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी व पैस खांब मूर्ती भेट देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी नेवासा येथील झालेला श्री मोहिनी अवतार, माऊलींची कर्मभूमी व ज्ञानेश्वरी रचनास्थान माहात्म्य सांगत त्यांनी नेवासा येथे येण्याचे त्यांना निमंत्रण दिले.यावेळी गुरुवर्य श्री देविदास महाराजांनी येथील सत्संगाचा लाभ घेतला.

यावेळी सत्संगात गुरुवर्य देविदास बाबांना बोलण्याची संधी मिळाली आणि बाबा बोलत असताना त्यांनी पसायदानात जे माऊलींनी विश्वशांतीसाठी प्रार्थना केली आहे तेच काम गुरुदेव श्री श्री रविशंकर महाराज करत असून ते एक ईश्वरी अंश आहेत त्यांचे कार्य जवळ जवळ १८२ देशात आहे ते ध्यान धारणेत योग मार्गाला नेण्याचे काम करतात असे गौरवोद्गार काढले.

बेंगलोर येथील ऊर्जास्रोत असलेले सोमनाथ मंदिर, गोशाळा वेद पाठशाळा, आयुर्वेद हॉस्पिटल याची सर्व पाहणी करून येथील स्थानाची माहिती प्रवीण पुजारी व चेतन भैय्या यांनी करून दिली. यावेळी नेवासा येथील विवेक नळकांडे, कृष्णाभाऊ शिसोदे,अनिल शिसोदे, किरण माळवदे,आदिनाथ महाराज पांगरे, संतसेवक दामोदर पवार उपस्थित होते



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Babasaheb Nawale To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: Karan Babasaheb Nawale" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmailID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# अहिल्यानगरच्या औद्योगिक भरारीसाठी प्रवरा बँकेने सज्ज राहावे : ना. विखे



प्रवरा सहकारी बँकेने सलग तिसऱ्या वर्षी 'शून्य टक्के एनपीए' राखण्यात मोठे यश मिळविले आहे. ठेवीदार आणि कर्जदार यांच्या भक्कम विश्वासामुळेच बँकेची प्रगती चांगल्या पद्धतीने होत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, यंदाच्या वर्षी सभासदांना १० टक्के लाभांश देण्याची घोषणा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपल्या भाषणात केली.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : औद्योगिक विकासाचे केंद्र म्हणून अहिल्यानगर जिल्हा ओळखला जाऊ लागला आहे. जिल्ह्यात येणारी गुंतवणूक लक्षात घेऊन येणाऱ्या उद्योगांनाही मदत करण्याच्या दृष्टीने प्रवरा बँकेने तयारी ठेवावी, असे आवाहन जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

प्रवरा सहकारी बँकेची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेस माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील, ट्रक वाहतूक सोसायटीचे चेअरमन नंदकिशोर राठी, प्रवरा फळे-भाजीपाला सोसायटीचे चेअरमन मकरंद गुणे, व्हाईस चेअरमन मच्छिंद्र थेटे, सोपानराव शिरसाठ, विजयराव लगड, शांतीनाथ आहेर, सहकारी संस्थांचे सहनिबंधक नामदेव ठोंबळ, बँकेचे मॅनेजर सौरभ बालोटे, कारखान्याचे कार्यकारी संचालक महेश कोनापुरे यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, अहिल्यानगर जिल्हा आता औद्योगिक विकासाचे मुख्य केंद्र बनत असून, जिल्ह्यामध्ये शिर्डीसह हरेगाव, बेलवंडी, अहिल्यानगर आणि राहुरी येथेसुद्धा आता औद्योगिक वसाहतींसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. उद्योजक मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यास तयार झाले आहेत. या उद्योगांशी आपण कसे जोडले जाऊ, याचा विचार प्रवरा सहकारी बँकेने निश्चित करावा अशी अपेक्षा व्यक्त करून, उद्योजक आणि बँक यांच्यातील नात्यामुळेच जिल्ह्यात रोजगार निर्मितीचा सकारात्मक परिणाम दिसून अयेईल, असे त्यांनी सांगितले.

बँकेने मागील आर्थिक वर्षात केलेल्या प्रगतीबद्दल त्यांनी संचालक मंडळाचे अभिनंदन केले. ५ हजार रुपयांच्या ठेवींवरून बँकेचा सुरू झालेला प्रवास आता १ हजार कोटी रुपयांच्या ठेवींपर्यंत यशस्वीपणे पोहोचला आहे. ठेवीदार व कर्जदार यांच्या विश्वासाचे हे प्रतीक असून, सुमारे १८०० कोटी रुपयांच्या व्यवसायाचा पूर्ण केलेला टप्पा हा नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी भूषणावह असल्याचे त्यांनी सांगितले. छोटे व्यावसायिक, उद्योजक आणि कर्जदार यांच्या मागणीप्रमाणे कर्जाची गरज पूर्ण करण्याचे काम बँकेच्या माध्यमातून होत असल्याबद्दल मंत्री विखे पाटील यांनी समाधान व्यक्त केले.

सहकारी बँकांचा प्रवास हा नागरी बँकांकडून शेड्युल्ड बँकेकडे होत आहे. बँकांना आता मूलभूत बदलांना सामोरे जावे लागत असून, प्राथमिक सोसायट्यांबरोबरच सहकारी बँकांच्या संदर्भात केंद्र सरकारने घेतलेले धोरण हे निश्चितच पाठबळ देणारे आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या दूरदृष्टीमुळे सहकारी बँकांना आता आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून मार्गक्रमण करणे सोपे झाले आहे. डिजिटल बँकिंग सुविधेमुळे ग्राहकांनाही आता योग्य सुविधा मिळत असून, या माध्यमातून व्यवसाय वृद्धी होऊ शकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, सहकारी बँका आणि पतसंस्थांच्या माध्यमातून होत असलेले आर्थिक घोटाळे ही सध्याच्या काळात चिंताजनक बाब झाली आहे. अशा सर्व परिस्थितीतही प्रवरा सहकारी बँकेने अतिशय पारदर्शकपणे केलेल्या चांगल्या कारभारामुळेच सलग तिसऱ्या वर्षी 'शून्य टक्के एनपीए' राखण्यात संचालक मंडळाला यश आल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. याप्रसंगी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील तसेच बँकेचे चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे यांनी आपले मनोगत व्यक्त करून बँकेच्या प्रगतीचा आढावा घेतला. विषय पत्रिकेवरील सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

## दखल

## गणेशोत्सवानिमित्त श्रीरामपूरकरांना सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

**श्रीरामपूर** : आझाद मैदान येथील मानाचा गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त श्रीरामपूरकरांसाठी दोन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. माजी आमदार स्वर्गीय जयंतराव ससाणे मित्र मंडळाच्या सहकार्याने २० सप्टेंबर रोजी 'नाना थोडा थांबा ना' या विनोदी नाटकाचे, तर २१ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध सौरभ भोसले यांच्या विनोदी कार्यक्रमाचे आयोजन खासदार गोविंदराव आदिक सभागृहात करण्यात आले आहे. या कार्यक्रमांच्या फलकाचे अनावरण आ. हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार ओगले यांनी मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक करत मंडळाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. नगराध्यक्ष करण ससाणे यांनी श्रीरामपूरची धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपण्याचे काम मंडळ करीत असल्याचे सांगून नागरिकांनी कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज नवले यांनी केले. यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर, मंडळाचे अध्यक्ष यश बोरावके यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## शारदा थ्रो बॉल लीगसाठी निवड चाचणी १५ सप्टेंबरला

**श्रीरामपूर** : सोमैया विद्या विहारच्या श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल, कोपरगाव यांच्या वतीने आयोजित शारदा थ्रो बॉल लीग २०२६ साठी विद्यार्थ्यांची निवड चाचणी मंगळवार,१५ सप्टेंबर रोजी शाळेच्या मैदानावर आयोजित करण्यात आली आहे.या लीगमध्ये प्रत्येक संघात इयत्ता ९ वी व १० वी मधील ३ मुले, इयत्ता ७ वी व ८ वी मधील ३ मुले,इयत्ता ८ वी ते १० वी मधील ३ मुलींचा समावेश असणार आहे. स्पर्धेचे अंतिम सामने रविवारी, २० सप्टेंबर रोजी रंगणार असून, विजेत्या संघाला आकर्षक ट्रॉफी दिली जाणार आहे. तसेच प्रत्येक सामन्यात चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना प्लेयर ऑफ द मॅच पुरस्काराने गौरवण्यात येईल. याच दिवशी सर्व संघांचे कर्णधार आणि अधिकृत संघांची घोषणा करण्यात येणार आहे. या संपूर्ण स्पर्धेचे आयोजन शाळेचे प्राचार्य के. एल. वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच जिल्ह्यात थ्रो बॉल खेळाचा प्रचार-प्रसार करणारे ज्येष्ठ क्रीडा शिक्षक धनंजय देवकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे.नाव नोंदणीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी गणेश वाघ व गणेश मोरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या स्पर्धेच्या विजेत्या संघाला तसेच उपविजेते व तिसऱ्या क्रमांकाच्या संघाला चषक कोपरगाव येथील यश कोचिंग क्लासेस यांच्यातर्फे देण्यात येतील.

## गोकुळाष्टमीनिमित्त वेशभूषा, आंधळी दहीहंडी स्पर्धा



**बेलापूर** : येथील छत्रपती तरुण मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे गोकुळाष्टमी सोहळा पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित बाल श्रीकृष्ण वेशभूषा व आंधळी दहीहंडी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे उद्घाटन महानुभाव पंथाचे सचिन महाराज लाड यांच्या हस्ते, बेलापूर पत्रकार संघाचे अध्यक्ष भास्कर खंडागळे व जनार्दन ओहळ यांच्या उपस्थितीत झाले. बाल श्रीकृष्ण वेशभूषा स्पर्धेत मानवीक दिनेश भगत याने प्रथम, रुद्रांश अक्षय म्हैस याने द्वितीय, तर हर्षित अभिषेक बारगळ याने तृतीय क्रमांक मिळविला. शिव रोहित शिंदे, विरांश विकी जाधव, गाथा अभिषेक खंडागळे यांना उत्तेजनार्थ, तर कुणाल केशव जाधव याला विशेष पुरस्कार देण्यात आला. स्पर्धेत २४ बालकांनी सहभाग घेतला. आंधळी दहीहंडीच्या लहान गटात साई विशाल आंबेकर, तर खुल्या गटात सार्थक सचिन कणसे विजेते ठरले. विजेत्यांना व सहभागी स्पर्धकांना भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमासाठी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

## मिथुन चव्हाण यांना 'समाजभूषण' पुरस्कार

**कोपरगाव** : सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे मिथुन राजाराम चव्हाण यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मोहनीराज होन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा गौरव सोहळा पार पडला. यावेळी लेखक व कवी गोरक्षनाथ पवार लिखित 'चमकणारे दिवे - भाग २' या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. विविध माध्यमांतून समाजासाठी सुरू असलेल्या मिथुन चव्हाण यांच्या सेवाकार्याला या पुस्तकातून शब्दरूप देण्यात आले आहे. 'समाजभूषण' पुरस्कार हा केवळ सन्मान नसून समाजसेवेच्या कार्याला मिळालेली प्रेरणादायी पावती असल्याची भावना चव्हाण यांनी व्यक्त केली. हा सन्मान आपल्या सेवाकार्यात साथ देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा असल्याचे त्यांनी सांगितले. 'चमकणारे दिवे'मधून आपल्या कार्याची दखल घेतल्याबद्दल त्यांनी लेखक गोरक्षनाथ पवार व मोहनीराज होन यांचे आभार मानले.

# गावकरी पतसंस्थेला तीन पुरस्कार खंडागळे 'बेस्ट चेअरमन'



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने १ कोटी ते ५ कोटी रुपये ठेव गटात बेलापूर येथील गावकरी पतसंस्थेला यंदा तीन मानाचे पुरस्कार प्राप्त झाले. कार्यक्षम पतसंस्था, अभिषेक खंडागळे यांना 'बेस्ट चेअरमन' तर व्यवस्थापक संदीप लोखंडे यांना कार्यक्षम अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने दरवर्षी तालुक्यातील पतसंस्थांना विविध पुरस्कार देण्यात येतात. यंदा गावकरी पतसंस्थेने तिन्ही पुरस्कार पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली. अल्पावधीत संस्थेने मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे कौतुक होत आहे.

माजी रिझर्व्ह बँक संचालक तथा सहकार भारतीचे सहसंस्थापक सतीशजी मराठे यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार वितरण सोहळा झाला. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष डॉ. शांतिलाल शिंगी व संचालक धनंजय तांबेकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष रामेश्वर सोमाणी, संचालक मंडळ तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

## ऋषी पंचमीनिमित्त पुणतांब्यात यात्रेची जय्यत तयारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : श्रीक्षेत्र पुणतांबा येथे ऋषी पंचमीनिमित्त भरणाऱ्या यात्रेची योगीराज चांगदेव महाराज देवस्थानच्या वतीने जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. मंगळवारी (दि. १५) ऋषी पंचमीचा पर्वकाळ असून, यानिमित्त पंचक्रोशीसह बाहेरगावांहून मोठ्या संख्येने भाविक पुणतांब्यात दाखल होण्याची शक्यता आहे.

गोदावरी नदीकाठावर योगीराज चांगदेव महाराज यांचे समाधीस्थळ असून, येथे ऋषी पंचमीच्या दिवशी भाविक गंगास्नान करून विविध धार्मिक विधी करतात. नदीच्या वाळूत शिवलिंग तयार करून त्याची पूजा करण्याचीही परंपरा आहे. यंदा सुमारे ५० हजारांहून अधिक भाविक यात्रेस उपस्थित राहण्याची शक्यता देवस्थान प्रशासनाने व्यक्त केली आहे.

यात्रेनिमित्त मंदिर परिसरात भाविकांसाठी दर्शनबारीची व्यवस्था करण्यात आली आहे. गंगास्नानानंतर महिलांना कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध करून देण्यात आला आहे.

भाविकांना आवश्यक असलेल्या अन्य सुविधांचीही व्यवस्था करण्यात येत असून, यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी देवस्थान प्रशासनाकडून नियोजन करण्यात आले आहे.

## विलास दाभाडे यांना धक्का, जिल्हा बँकेच्या मतदार यादीतून नाव वगळले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : जिल्हा सहकारी बँकेच्या प्रारूप मतदार यादीतील श्री संत सावता सोसायटीचे संचालक विलास दाभाडे यांचे नाव वगळले. हा आदेश विभागीय सहनिबंधक यांनी दिला होता. श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील श्री संत सावता माळी वि.का.सेवा संस्था लि.या संस्थेचे नाव जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाच्या सन २०२६ ते २०३१ या कालावधीच्या पंचवार्षिक निवडणूककामी प्रारूप मतदार यादीतील प्रतिनिधी विलास भाऊसाहेब दाभाडे यांचे नाव परिशिष्ट अ नूसार वगळण्याचा निर्णय जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिंबधक, सहकारी संस्था नाशिक विभाग संभाजी कदम यांनी नूकताच दिला आहे. श्री संत सावता माळी वि.का.सेवा संस्थेचे संचालक विलास भाऊसाहेब दाभाडे यांनी जिल्हा बँक निवडणूकीत सहभाग घेण्यासाठी श्री संत सावता माळी सेवा संस्थेने त्यांच्या नावाचा ठराव दिला होता.

संबधित ठरावास येथील आप्पासाहेब नानासाहेब रणनवरे यांनी हरकत घेतली होती. त्या हरकतीनूसार दाभाडे यांच्या आजी सुभद्राबाई दगडू नाईक यांच्या नावावर गट नं.७६ मध्ये २ हेक्टर ८५ आर इतकी जमीन होती. या जमीनीवर टाकळीभान सोसायटीचे कर्ज थकीत असताने बेकायदेशीर हस्तांतर करून विलास दाभाडे व कुटूंबाच्या नावावर करण्यात आले आहे. या क्षेत्रावर ८ लाख ८१ हजार मुद्दल व ९ लाख ६९ हजार रूपये व्याज असे एकूण १८ लाख ५० हजार रूपयांची थकबाकी आहे. त्यांनी ती थकबाकी न भरता तसेच न दर्शविता निवडणूक लढवून संचालकपद मिळविले आहे. त्यामुळे ते सदस्य म्हणून राहण्यास व ठराव देण्यास अपात्र असल्याचे हरकतीत म्हटले होते.

यासंदर्भात विलास दाभाडे यांचे म्हणणे ऐकण्यात येवून सहाय्यक निंबधक व जिल्हा उपनिंबधक यांचाही अभिप्राय नोंदविण्यात आला होता. मात्र तो फेटाळण्यात आला. त्यानूसार दाभाडे यांचे जिल्हा सह बँकेच्या प्रारूप यादीतील नाव परिशिष्ट अ नूसार वगळण्यात आल्याचा निर्णय देण्यात आला आहे. ऐन जिल्हा बँकेच्या निवडणूकीच्या तोंडावर हा मोठा धक्का मानला जात आहे.

## स्व. देविदास मैड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देवस्थानला जलसुविधा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : कर्जत राशीन येथील विजय मैड व नेवासा येथील सौ.मनिषा बालेंद्र पोतदार परिवाराच्या वतीने स्वर्गीय देविदास गणपतराव मैड(राशीन)यांच्या स्मृती प्रित्यर्थ नेवासा येथील संत नरहरी महाराज देवस्थानला पिण्याच्या पाण्यासाठी कुपनलिका व विद्युत चलीत्र संच भाविकांच्या सेवेसाठी लोकार्पण करण्यात आला. यावेळी झालेल्या लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी सुवर्णकार समाज संघटनेचे मार्गदर्शक बालेंद्र मारुतराव पोतदार व सौ.मनिषा बालेंद्र पोतदार यांच्या हस्ते संत नरहरी महाराजांच्या मूर्तीस वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालून कलश पूजा करण्यात आली. यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे पौरोहित्य नेवासा येथील वेदशास्त्रसंपन्न आचार्य ऋषिकेश उर्फ पांडूगुरू जोशी यांनी केले. यावेळी बोअर मशिनरीचे पूजन यजमानांच्या हस्ते करण्यात येऊन कूपनलिका व विद्युत चलीत्र सेवेचा शुभारंभ करण्यात आला.देवस्थानचे अध्यक्ष पत्रकार अशोकराव डहाळे यांनी आलेल्या भाविकांचे स्वागत केले.जेष्ठ मार्गदर्शक रमाकांत मैड यांच्या हस्ते भाविकांसाठी वरील सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल मैड व पोतदार परिवाराला धन्यवाद देत शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी रमाकांत मैड, बाळासाहेब आंबिलवादे,विनायक आंबिलवादे, देवस्थानचे अध्यक्ष अशोकराव डहाळे,महिला मंडळाच्या कल्पनाताई डहाळे, सचिव श्रीकांत डहाळे, विनायक लोळगे,नगरसेवक निरंजन डहाळे, अथर्व पोतदार, बोअर चालक चंदू घोडके यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रामपूरवाडीत विजेचा लपंडाव ग्रामस्थांचा तीव्र संताप, उपोषणाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील रामपूरवाडी येथे गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या अघोषित वीजकपातीमुळे आणि विजेच्या लपंडावमुळे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. महावितरणच्या पुणतांबा केंद्रांतर्गत येणाऱ्या रामपूरवाडीतील नागरिक प्रामाणिकपणे व नियमितपणे वीजबिले भरत आहेत, परंतु तरीही वारंवार वीज खंडित होत असल्याने ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन तसेच शेतीची कामे पूर्णपणे विस्कळीत झाली आहेत.

या भोंगळ कारभाराविरोधात ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, माजी सरपंच संदीप सुरडकर यांनी महावितरण प्रशासनाला घरघरचा इशारा दिला आहे. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा लवकरात लवकर सुरळीत करावा, अन्यथा पुणतांबा येथील महावितरण कार्यालयावर तीव्र स्वरूपाचा मोर्चा काढण्यात येईल, तसेच येत्या चार दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास पुणतांबा येथे उपोषण सुरू करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. प्रामाणिकपणे बिल भरूनही वीज मिळत नसल्यामुळे ग्रामस्थांमधून महावितरणच्या कारभाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त होत असून, आता या इशाऱ्यानंतर प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ग्रामस्थ प्रामाणिकपणे वीजबिल भरतात, मग वीजपुरवठा देण्यामध्ये चालढकल का? महावितरणने तातडीने वीज समस्या सोडवावी, अन्यथा तीव्र आंदोलनाला सामोरे जावे लागेल.

**संदीप सुरडकर, माजी सरपंच, रामपूरवाडी**

# शेतकऱ्यांच्या वीजप्रश्नाचे राजकारण नको; तोडगा हवा : कानवडे

## दिवसा सोयीच्या वेळेत थ्री-फेज वीजपुरवठ्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



संगमनेर तालुक्यातील धांदरफळ येथे वीजप्रश्नासाठी आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांना न्याय मिळावा, या मागणीला आमचा पूर्ण पाठिंबा आहे.शेतकऱ्यांना दिवसा आणि त्यांच्या सोयीच्या वेळेत सुरळीत थ्री-फेज वीजपुरवठा मिळालाच पाहिजे, ही आमची स्पष्ट भूमिका आहे.मात्र, काहीजण केवळ राजकीय अस्तित्व दाखविण्यासाठी किंवा आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका डोळ्या समोर ठेवून आपले नेतृत्व सिद्ध करण्यासाठी आंदोलन करत आहे

**आशिष कानवडे, शिवसेना नेते**

**संगमनेर** : महावितरणकडून शेतीसाठीच्या थ्री-फेज वीजपुरवठ्याच्या वेळेत वारंवार बदल होत असल्याने धांदरफळ गटातील शेतकरी अडचणीत आले आहेत. सध्या रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना रात्री शेतात जाऊन पिकांना पाणी द्यावे लागत आहे.

दरम्यान, वीजपुरवठ्याच्या वेळेतील बदल तांत्रिक अडचणी आणि अतिरिक्त वीजदाबामुळे तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आला आहे. परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी महावितरणकडून कार्यवाही सुरू असताना, केवळ या प्रश्नाचे श्रेय घेण्यासाठी आंदोलन करणे योग्य नाही. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाचे राजकारण न करता तो कायमस्वरूपी सोडविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे, अशी भूमिका शिवसेनेचे आशिष कानवडे व भागवत कानवडे यांनी मांडली. धांदरफळ गटातील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या वीज समस्यांची माहिती आमदार अमोल खताळ यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने संबंधित महावितरण अधिकाऱ्यांशी संपर्क साधला.

तांत्रिक अडचणी तसेच अतिरिक्त वीजदाबाबाबत माहिती घेऊन गणेशोत्सवाच्या काळात शेतकऱ्यांचा वीजपुरवठा अनावश्यक पणे खंडित होणार नाही, याची विशेष काळजी घेण्याबाबतच्या सूचना आ. खताळ यांनी महावितरणच्या सर्वच अधिकार्यांना दिल्या आहेत.

अतिरिक्त वीजदाबाची गंभीर समस्या लक्षात घेऊन पुढील चार-पाच दिवसां मध्ये थ्री-फेज वीजपुरवठ्याच्या वेळेत शेतकऱ्यांच्या सोयीच्या दृष्टीने योग्य तो बदल करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. तसेच ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड झाल्यानंतर शेतकऱ्यांना दीर्घ काळ वीजवंचित राहावे लागू नये, यासाठी काही दिवसांत विनामूल्य नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे कानवडे यांनी सांगितले.

## लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या ९६ व्या जयंती निमित्त ऊस उत्पादकांचा गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : नेवासा तालुक्यातील भेंडा येथील ज्ञानेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त मंगळवार दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी ऊस उत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा श्री ज्ञानेश्वर ऊस उत्पादकता पुरस्काराने गौरव करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी संचालक अनिल शेवाळे यांनी दिली.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्रीसंत नागेबाबा भक्त निवास येथे मंगळवार दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता श्रीसदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत गुरुवर्य श्री उद्धवजी महाराज मंडलिक (नेवासेकर) यांचे शुभहस्ते व लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांचे अध्यक्षतेखाली हा शेतकरी गौरव सोहळा संपन्न होणार आहे.

जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष व माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, अँड. देसाई देशमुख, कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांची प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमाला सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, विविध संस्थांचे पदाधिकारी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान १ वरुन

### माजी भाजप नगरसेवक स्वप्निल शिंदेसह चौघांवर 'मोक्का'

त्यानंतर माजी नगरसेवक स्वप्निल शिंदे व महेश कुन्हे यांना नाशिक कारागृहातून ताब्यात घेऊन या गुन्ह्यात वर्ग करून अटक करण्यात आली.

आरोपींनी पूर्वनियोजित पद्धतीने आणि संघटितरीत्या आर्थिक गुन्हा केल्याचे तपासात समोर आल्यानंतर पोलिसांनी मोक्काचा प्रस्ताव तयार केला. पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्यामार्फत हा प्रस्ताव नाशिक परिक्षेत्राच्या पोलिस महानिरीक्षकांकडे पाठविण्यात आला. प्रस्तावाची छाननी केल्यानंतर त्यास मंजुरी देण्यात आली. सध्या शहर उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे या गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

जमीन फसवणुकीच्या प्रकरणातील ताज्या मोक्का कारवाईमुळे अहिल्यानगरातील जमीन व्यवहार, बनावट कागदपत्रे आणि भू-माफिया रॅकेटवर पोलिसांचा आता थेट फोकस असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### बोराडे खून प्रकरणाचा पर्दाफाश

विश्लेषणाच्या आधारे तपास करत असताना १३ सप्टेंबर २०२६ रोजी हा गुन्हा प्रसाद अशोक अडगळे याने त्याच्या तीन अल्पवयीन साथीदारांच्या मदतीने केल्याची माहिती समोर आली. तसेच यातील मुख्य आरोपी पुणे येथे असल्याची खात्रीलायक माहिती मिळताच पथकाने पुणे शहरात शोध घेऊन एका विधिसंघर्षग्रस्त बालकास (वय १७, रा. भुम, जि. धाराशिव) ताब्यात घेतले.

त्यानंतर गुन्ह्यातील इतर आरोपी राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथे असल्याची माहिती मिळाल्याने पथकाने तेथे धाड टाकून प्रसाद अशोक अडगळे (वय १८, रा. टाकळीमियाँ, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) याच्यासह आणखी दोन विधिसंघर्षग्रस्त बालकांना (वय १६, रा. कारखाना रोड, टाकळीमियाँ आणि वय १७, रा. टाकळीमियाँ) ताब्यात घेतले.ताब्यात घेण्यात आलेल्या सर्व चारही आरोपींना (एक सज्ञान आरोपी व तीन अल्पवयीन बालके) पुढील तपासासाठी खर्डा पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले असून खर्डा पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

ही धडक कारवाई अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# जामखेडमध्ये जरांगे पाटील यांच्या स्वागताची जय्यत तयारी

## अखंड मराठा समाजाची नियोजन बैठक; ठिकठिकाणी स्वागत कमानी, पाणी-नाश्त्याची व्यवस्था



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर १९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या उपोषणाची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर ते जामखेडमार्गे मुंबईकडे रवाना होणार असल्याने त्यांच्या स्वागतासाठी जामखेड शहर व तालुक्यातील मराठा बांधवांकडून जय्यत तयारी सुरू आहे.

याबाबत अखंड मराठा समाज जामखेडच्या वतीने रविवारी (दि. १३) नियोजन बैठक घेण्यात आली. बैठकीत जरांगे पाटील यांच्या स्वागतासह मुंबईकडे जाणाऱ्या मराठा बांधवांसाठी पाणी, बिस्किटे, नाश्ता व अन्य खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्याबाबत चर्चा झाली. तसेच शहर व तालुक्यातील विविध ठिकाणी स्वागत कमानी व फलक उभारण्याचे नियोजन करण्यात आले.

जरांगे पाटील १५ सप्टेंबर रोजी रात्री बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे मुक्कामी थांबणार असून, १६ सप्टेंबर रोजी सकाळी जामखेडमार्गे मुंबईकडे रवाना होणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. मोहा फाटा येथे मोहा, रेडेवाडी व परिसरातील गावांच्या वतीने स्वागत कमानी उभारण्यात येणार आहेत. साकत फाटा येथे धोत्री, सावरगाव, साकत परिसरातील मराठा बांधवांकडून स्वागत करण्यात येणार असून, रॅलीतील सहभागींसाठी पाणी, बिस्किटे व खाद्यपदार्थांचे वाटप केले जाणार आहे.

जामखेड शहरात मार्केट कमिटी, विश्वक्रांती चौक, बीड कॉर्नर, जयहिंद चौक, खर्डा चौक, शंभुराजे कुस्ती संकुल, पंचायत समिती कार्यालय, एस.टी. बसस्थानक, नगर रोड, पंचदेवालय चौक तसेच पाटोदा-अरणगाव येथे स्वागताचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे शहर व तालुक्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### मदतीसाठी आवाहन

जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी तसेच मुंबईकडे जाणाऱ्या मराठा बांधवांसाठी आणखी काही प्रकारची मदत करू इच्छिणाऱ्या नागरिकांनी अखंड मराठा समाज जामखेडशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# १४० विद्यार्थ्यांनी साकारला पर्यावरणपूरक गणराया

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी आदर्श गाव वाघोली येथे अनोखा उपक्रम राबविण्यात आला. शिक्षण व युवक विकास समितीच्या वतीने वाघोली जिल्हा परिषद केंद्र शाळेत पर्यावरणपूरक गणपती बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली.



यात वाघोली, कुरणवस्ती, जमधडेवस्ती, दातीरवस्ती, पवार-शेळकेवस्ती, गोपाळवस्ती व बहीरोबावाडी येथील शाळांमधील १४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आनंद महाविद्यालयाचे प्रा. सूर्यकांत काळोखे यांनी विद्यार्थ्यांना शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. युवा नेतृत्व उमेश भालसिंग यांच्या संकल्पनेतून 'पर्यावरण वाचवा, भविष्य घडवा' या संदेशावर आधारित हा उपक्रम राबविण्यात आला.

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण टाळण्यासाठी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेनुसार विविध आकारांच्या गणेशमूर्ती साकारल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याबरोबरच त्यांच्या सर्जनशीलतेलाही वाव मिळाला.

कार्यक्रमास सरपंच सुश्मिता भालसिंग, मोहन गवळी, राजेंद्र जमधडे, संभाजी सरगर, ग्रामसेविका जनाताई फटाले, अभिषेक भालसिंग, रामभाऊ गाडगे, केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका शोभा मंडलिक यांच्यासह ग्रामस्थ, पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी केंद्रप्रमुख शहादेव काळे, मुख्याध्यापक अशोक शिपलकर, राहुल नजन, अमोल जायभाये, जयदीप राजळे, कल्याण शिंदे, राजेंद्र ब्राम्हणे, दत्तात्रय पवार व शिक्षकवृंदांनी सहकार्य केले.

## निधन वार्ता

### नितीन दळवी



**श्रीरामपूर** : स्वयंवर मंगल कार्यालयाचे मालक माधवराव धोंडीबा दळवी यांचे धाकटे चिरंजीव नितीन माधवराव दळवी (वय ४७) यांचे आज शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता ब्रेन स्ट्रोकमुळे निधन झाले. त्यांच्या निधनाने दळवी परिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, भाऊ, चुलते, एक मुलगा व पुतणे असा परिवार आहे. मारुतराव दळवी यांचे ते पुतणे, सचिन दळवी यांचे बंधू तसेच चि. नील दळवी यांचे वडील होत.

# महाराष्ट्रातील आत्महत्यांचे वाढते प्रमाण चिंताजनक

आत्महत्या ही केवळ एखाद्या व्यक्तीच्या जीवनाशी संबंधित घटना नसून ती कुटुंब, समाज आणि संपूर्ण व्यवस्थेसमोर उभे राहिलेले गंभीर आव्हान आहे. महाराष्ट्रात आत्महत्यांचे वाढते प्रमाण चिंतेचा विषय बनले आहे. विशेषतः तरुण विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये वाढणारी मानसिक अस्वस्थता समाजाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. वृत्तपत्रातील आकडेवारीही या समस्येचे गांभीर्य अधोरेखित करते. त्यामुळे आत्महत्यांकडे केवळ आकडे म्हणून न पाहता त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि मानसिक कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात आर्थिक अडचणी, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, कौटुंबिक समस्या, नातेसंबंधांतील ताण, शैक्षणिक दबाव, भविष्यातील अनिश्चितता आणि एकटेपणा यामुळे अनेकांना मानसिक तणावाचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागात शेतीशी संबंधित अडचणी आणि आर्थिक अस्थिरता तर शहरी भागात स्पर्धात्मक जीवनशैली व वाढता मानसिक ताण ही चिंतेची कारणे आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये वाढणारा ताण विशेष चिंताजनक आहे. परीक्षेतील गुण, पालकांच्या अपेक्षा, प्रवेशाची स्पर्धा, करिअरची चिंता आणि मित्रांशी होणारी तुलना यामुळे काही विद्यार्थ्यांवर अनावश्यक मानसिक दबाव निर्माण होतो. मुलांनी प्रत्येक क्षेत्रात अव्वल असलेच पाहिजे, असा आग्रह पालकांनी धरू नये. अपयश हा जीवनाचा शेवट नसून शिकण्याची आणि पुन्हा प्रयत्न करण्याची संधी आहे, हा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक आरोग्याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. बदलती कुटुंबव्यवस्था, मुलांचे स्थलांतर, एकटेपणा, आरोग्याच्या समस्या आणि सामाजिक संपर्क कमी होणे यामुळे त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते. कुटुंबातील सदस्यांनी ज्येष्ठांशी नियमित संवाद साधणे, त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे आणि त्यांच्या भावनांना महत्त्व देणे आवश्यक आहे.

आत्महत्या रोखण्यासाठी मानसिक आरोग्याविषयी खुलेपणाने बोलण्याची संस्कृती निर्माण झाली पाहिजे. मानसिक तणाव म्हणजे कमजोरी नसून तोही आरोग्याशी संबंधित प्रश्न आहे, हे समाजाने स्वीकारले पाहिजे.

शाळा-महाविद्यालयांमध्ये समुपदेशकांची उपलब्धता वाढवावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या वर्तनातील बदलांकडे संवेदनशीलतेने पाहावे. पालकांनी केवळ अभ्यास आणि गुणांबाबत विचारपूस न करता मुलांच्या भावनिक स्थितीबद्दलही संवाद साधावा.

सोशल मीडियामुळेही तरुणांमध्ये स्वतःची इतरांशी तुलना करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. इतरांचे यश, आर्थिक स्थिती किंवा जीवनशैली पाहून स्वतःला कमी लेखण्याची भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर आणि प्रत्यक्ष माणसांशी संवाद यांचे महत्त्व समजावून सांगणे गरजेचे आहे.

कुटुंबातील संवाद हा या समस्येवरचा सर्वांत महत्त्वाचा आधार ठरू शकतो. एखादी व्यक्ती सतत निराश दिसत असेल, एकटी राहण्याचा प्रयत्न करत असेल किंवा जीवनाबद्दल अत्यंत नकारात्मक बोलत असेल, तर तिची थट्टा किंवा टीका करण्याऐवजी तिचे म्हणणे शांतपणे ऐकले पाहिजे. गरज भासल्यास विश्वासू व्यक्ती, समुपदेशक किंवा मानसिक आरोग्यतज्ज्ञांची मदत घेण्यासाठी तिला प्रोत्साहित केले पाहिजे.

सरकारने मानसिक आरोग्य सेवा अधिक सुलभ आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याबरोबरच ग्रामीण भागातही समुपदेशनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. शेतकरी, विद्यार्थी, कामगार, महिला आणि ज्येष्ठ नागरिक अशा विविध घटकांसाठी स्थानिक पातळीवर मदतव्यवस्था मजबूत झाली पाहिजे. माध्यमांनीही आत्महत्यांच्या बातम्यांचे वार्तांकन करताना संवेदनशीलता आणि जबाबदारी पाळणे आवश्यक आहे.

आत्महत्या रोखणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही; ती कुटुंब, शैक्षणिक संस्था, समाज आणि प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आकडेवारी कमी करण्याबरोबरच त्यामागची कारणे कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. माणसांमधील संवाद, आपलेपणा आणि आधार वाढला तर अनेक संकटांना सामोरे जाण्याची ताकद निर्माण होऊ शकते. कोणत्याही व्यक्तीला तिच्या अडचणींमध्ये एकटे पडू न देणे, हाच आत्महत्या प्रतिबंधाचा खरा सामाजिक मार्ग आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

## नाशिकच्या सहा आदिवासी आश्रमशाळांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

### आहार, शालेय साहित्य व विविध खर्चाच्या नोंदींच्या चौकशीची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शनिशिंगणापूर / सोनई** : नाशिक जिल्ह्यातील सहा शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या आहारासह विविध शासकीय निधीच्या वापराबाबत अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी पत्रकार मोहन शेगर यांनी आदिवासी विकास आयुक्तांकडे केली आहे.

माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त कागदपत्रांच्या आधारे काही बाबी संशयास्पद असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या आहारासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असताना, विद्यार्थ्यांना नियमानुसार पुरेसा व पौष्टिक आहार मिळतो का, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

धोंडबार (ता. सिन्नर), बाडगी व आंबे (ता. पेठ), देवसाने व पिंपरखेड (ता. दिंडोरी) तसेच शेणवड खुर्द (ता. इगतपुरी) येथील शासकीय आश्रमशाळांचा तक्रारीत समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या आहाराच्या नोंदवह्या, अन्नधान्य व इतर साहित्याचा पुरवठा, संबंधित बिले व देयके तसेच पुरवठादार अथवा कंत्राटदाराच्या कामाची प्रत्यक्ष पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय स्टेशनरी, पाणी फिल्टर, शालेय साहित्य, क्रीडा साहित्य आणि अन्य खरेदीच्या बिलांचीही चौकशी करण्याची मागणी आहे.

काही ठिकाणी कागदोपत्री नोंदी आणि प्रत्यक्ष उपलब्ध सुविधा यामध्ये तफावत आहे का, याची स्थळपाहणी करून तपासणी करावी. तसेच शिक्षकांच्या जात प्रमाणपत्रांशी संबंधित नोंदी, विविध नोंदवह्या आणि शासकीय अभिलेखांचीही पडताळणी करावी, असे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोष आढळल्यास संबंधित मुख्याध्यापक, कर्मचारी, पुरवठादार तसेच लेखापरीक्षण अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी मोहन शेगर यांनी केली आहे. चौकशी न झाल्यास आदिवासी विकास आयुक्तांच्या कार्यालयासमोर मुदत आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

## लोकनेते मारुतराव घुले पाटील यांनी परिसर समृद्ध केला : शिवशाहीर कल्याण काळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**एरंडगाव** : लोकनेते मारुतराव घुले पाटील यांनी दूरदृष्टीने परिसराच्या सर्वांगीण विकासाचा पाया रचत शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे परिसराच्या विकासाला चालना मिळाली, असे प्रतिपादन ह.भ.प. शिवशाहीर कल्याण महाराज काळे यांनी केले. शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी राजश्रीताई घुले पाटील होत्या. पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितीज घुले पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कल्याण महाराज काळे यांनी आपल्या मधुर वाणीतून घुले पाटील यांच्या कार्याचा गौरव केला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याचा पोवाडा सादर करून उपस्थित विद्यार्थ्यांची दाद मिळविली. डॉ. क्षितीज घुले पाटील म्हणाले की, स्व. मारुतराव घुले पाटील यांनी ग्रामीण भागात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा बदलत्या काळानुसार विस्तार होत असून, जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक संकुलात विविध अभ्यासक्रमांसह संगणक क्षेत्रातील अभ्यासक्रमही ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झाले आहेत. आ. डॉ. नरेंद्रजी घुले पाटील व आ. चंद्रशेखर घुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य पुढे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात राजश्रीताई घुले पाटील यांनी घुले पाटील यांच्या दूरदृष्टीचा उल्लेख करून त्यांच्या विचारातून झालेला शैक्षणिक व सामाजिक कायापालट अधोरेखित केला. प्रास्ताविक प्रा. बाळासाहेब मंडलिक यांनी केले. स्वागत प्राचार्य प्रा. डॉ. रमेश खैरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मकरंद बारगुजे यांनी केले, तर आभार पर्यवेक्षक मच्छिंद्र पानकर यांनी मानले. कार्यक्रमास ह.भ.प. हमीद सय्यद, सुधाकर काळे, डॉ. श्रुती, शब्बीरभाई, सुभाष पवार, सूर्यकांत पाऊलबुद्धे, बाळासाहेब मरकड, सुरेश घाणमोडे, विजय घुले यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुळा कारखान्याच्या संचालिका विमलबाई सोनवणे यांचे निधन



**सोनई** : नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील रहिवासी तथा मुळा सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका गं.भा. विमलबाई नारायण सोनवणे (वय ७०) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने घोडेगाव परिसरात शोककळा पसरली आहे. विमलबाई सोनवणे यांनी घोडेगाव ग्रामपंचायतीच्या सदस्या तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती, नेवासा येथील संचालिका म्हणून उल्लेखनीय काम केले. सामाजिक व सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना त्यांनी सर्वसामान्यांशी जिव्हाळ्याचे संबंध जपले. धार्मिक वृत्ती, मनमिळावू स्वभाव आणि सर्वांशी आपुलकीने वागण्यामुळे त्या परिचित होत्या. मुळा सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली. त्यांच्या अकस्मात निधनाने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेकांनी हळहळ व्यक्त केली. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. घोडेगाव ग्रामपंचायतीचे सदस्य वसंतराव सोनवणे, उद्योजक शरदराव सोनवणे तसेच दिगंबर सोनवणे व दत्तात्रय सोनवणे यांच्या त्या मातोश्री होत.

नोंदणी क्र. :- ए.एन.आर / के.पी.एन / आर.एस.आर / सी.आर. ६९६ सन १९९४
दिनांक :- १ जानेवारी १९९४

**सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. राहाता ता. राहाता जि.अ.नगर**
(ऑफिस फोन नं. २४२५७४)

जावक क्रं. १७७ / वा. सभा/२०२६.२७ दिनांक : ०२.०९.२०२६

**३३ वी वार्षीक सर्वसाधारण सभा नोटीस (फक्त सभासदासांठी)**

संस्थेच्या सर्व सभासदांना विनंती पुर्वक कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची ३३ वी अधिमंडळाची वार्षीक सर्वसाधारण सभा वार- शुक्रवार दिनांक २५.०९.२०२६ रोजी दुपारी ठिक १.०० वाजता संस्था कार्यालय जैन स्थानक समोर राहाता येथे संस्थेचे चेअरमन मा. सौ. गुरावे चंद्रप्रभा विजयकुमार यांचे अध्यक्षतेखाली पुढील विषयांचा विचार विनिमय करणेसाठी आयोजीत केली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. हि विनंती..

**सभेपुढील विषय**
१) मागिल वार्षीक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२) सन २०२५-२६ अखेरचे संस्थेचे तेरीज, ताळेबंद, नफातोटा पत्रक वाचुन स्विकृत करणे.
३) सन २०२५-२६ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचुन स्विकृत करणे.
४) सन २०२४-२५ चे वैधानिक लेखापरिक्षकाच्या अहवालातील दोष दुरूस्ती अहवालाचा विचार करणे व स्विकृत करणे.
५) सन २०२६-२७ या पुढील वर्षाकरिता उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक मंजुर करणे.
६) संस्थेचे सन २०२५-२६ चे नफा-विभागणीस मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.
७) सन २०२६-२७ या आर्थीक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे व त्यांचे मानधनास मान्यता देणे.
८) मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत.
९) प्रशिक्षण / कर्ज / गुंतवणुकी / कर्ज वसुली इत्यादी तत्सम धोरणांना मान्यता देणे.
१०) संस्थेच्या नावावर *र* प्रमाणपत्राने हस्तांतरन झालेल्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा घेवुन विक्री करणे बाबत.
११) संस्थेच्या वार्षीक सर्वसाधारण सभेस अनुपस्थिती असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे.
१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांचा विचार विनिमय करणे.

**ठिकाण- राहाता**
**दिनांक :- ०२.०९.२०२६**

**मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**आपले विश्वासु**
**श्री. बी.जी.आत्रे. मॅनेजर**
**सरस्वती महिला नागरी सह. पत. संस्था मर्या. राहाता**

**Change Of The Name**

My Old Name Is **Akib Latif Sayed** And My New Name Is **Akib Latif Sayyad**
Address : Gondhavani Ward No 1 Shrirampur

**Change Of The Name**

My Old Name Is **Aayesha Latif Sayyed** And My New Nane Is **Aysha Ajmuddin Sayyad**.
Address : Nyati Evita Isabell Lohogaon Pune

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**सोमवार, दि.१४ सप्टेंबर २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७९ २७८ ३७७ | ८ - २ | १५० २४० ६०० | जोड ७०-४६-३१ २५-६९ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४५ २३५ ५५० | ६ - ३ | १२० ६७० ३०० | जोड ०७-१३-२६-८९-३४ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १५६ १२९ ११० | ९ - १ | १३० १४९ ११२ | जोड २०-८४-५१-७९-४३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

द • ख • ल

## पाठक व साबळे यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्कार जाहीर





**हातगाव :** राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दिला जाणारा उत्कृष्ट अभियंता पुरस्कार शेवगाव येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय कार्यालयात कार्यरत असलेले उपअभियंता प्रल्हाद अनंत पाठक व कनिष्ठ अभियंता शैलेश विष्णू साबळे यांना जाहीर झाला असून त्याचे वितरण थोड्याच दिवसात विविध अधिकारी,पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रत्येक वर्षी असे हे पुरस्कार दिले जात असून चालू वर्षाचा सन २५ /२६ पुरस्कार पाठक व साबळे यांना जाहीर झाला आहे. जाहीर झालेले हे पुरस्कार प्रत्येक वर्षी १५ सप्टेंबर रोजी असणाऱ्या भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरया यांच्या जयंतीचे औचित्य साधून जाहीर करण्यात येत असतात पाठक व साबळे यांना राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जाहीर झालेल्या या पुरस्काराबद्दल अरुंधती शर्मा मॅडम,मुख्य अभियंता विवेक माळुंदे ,अधीक्षक अभियंता युवराज कोकरे या प्रमुख अधिकाऱ्यांचे वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभले असल्यामुळेच आम्ही पुरस्कारास पात्र ठरलो आहोत अशी माहिती पाठक व साबळे यांनी दिली असून जाहीर झालेल्या पुरस्काराबद्दल आमदार मोनिकाताई राजळे, यांचेसह शेवगाव तालुक्यातील विविध क्षेत्रातून पाठक व साबळे यांचे अभिनंदन होत आहे.

## शाडू मातीचे गणपती बनवा कार्यशाळा



**अहिल्यानगर :** श्री बडीसाजन ओसवाल युवक संघ आणि नगर जल्लोष (ट्रस्ट), रेडीओ सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने, प्रसिद्ध शिल्पकार बालाजी वल्लाल यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने, शाडूमातीपासून गणपती बाप्पाची मूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेस सर्व स्तरातून उदंड असा प्रतिसाद लाभला. या कार्यशाळेस १२५ च्या वर जणांनी सहभाग नोंदवला. कार्यशाळेचे उदघाटन आ. जगताप, महापौर ज्योती गाडे, पेमराज बोथरा यांच्या हस्ते झाले. दोन्ही संस्था समाजाभिमुख कार्य करीत आहे. असे कार्य त्यांच्याकडून व्हावे याच शुभेच्छा. यावेळी उद्धव शिंदे, खामकर, सुहास मुळे, सागर बोगा, उपाध्यक्ष गुंजन शिंगवी, पल्लवी बोगा, दिपक गुंडू, सचिन बोगा, राहुल पाटोळे, प्रसन्न पाठक तसेच बडीसाजन ओसवालचे मनोज चोपडा, प्रविण शिंगवी, सचिन बडेरा, अक्षय भंडारी, राहुल संचेती, संकेत राठोड यांनी परिश्रम घेतले.

## विकास आराखड्यातील दुबार आरक्षणावर हरकती नोंदवा!



**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेने नगर शहरासाठी तृतीय सुधारित विकास आराखड्याचा ठराव नुकताच सर्वसाधारण सभेत मंजूर केला आहे. या सुधारित आराखड्याचे अवलोकन करताना शहराच्या विकास नियोजनासाठी विविध १८ प्रकारची आरक्षणे प्रस्तावित करण्यात आल्याचे दिसून येते. यामध्ये बसस्थानक, दफनभूमी, सामुदायिक सभागृह, शैक्षणिक सुविधा, अग्निशमन केंद्र, उद्याने, आरोग्य सुविधा, ग्रंथालय, वाहनतळ, क्रीडांगण आदींचा समावेश आहे. या विविध आरक्षणांसाठी नगर शहरातील सुमारे ४७९ क्षेत्र आरक्षित करण्यात आल्याचे ॲड. अनिकेत अनिल कुलाळ यांनी सांगितले. सन २०३९ पर्यंत शहराचा नियोजित विकास व्हावा, हा विकास आराखड्याचा प्रमुख उद्देश असल्याचे सांगताना ॲड. कुलाळ यांनी आरक्षणांच्या नकाशांचा बारकाईने अभ्यास करण्याची गरज व्यक्त केली. जुन्या व नवीन आराखड्यांची तुलना केली असता काही ठिकाणी पूर्वी आरक्षित असलेले क्षेत्र कमी करण्यात आले असून, काही नवीन क्षेत्रांचा समावेश करण्यात आल्याचे दिसून येते. मात्र, काही ठिकाणी एकाच क्षेत्रावर दुबार आरक्षण करण्यात आल्याचे निदर्शनास येत असल्याचा दावा त्यांनी केला. पूर्वीच्या आराखड्यात आरक्षित असलेल्या काही क्षेत्रांचे आरक्षणाचे स्वरूप किंवा हेड बदलून त्याच ठिकाणी पुन्हा आरक्षण करण्यात आल्याचे आढळून येत असल्याचेही ॲड. कुलाळ यांनी नमूद केले. त्यामुळे संबंधित भूखंडधारकांनी नवीन व जुन्या आराखड्यांची तुलना करून आपल्या मालमत्तेवर आरक्षणाची पुनरावृत्ती झाली आहे का, याची खात्री करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी प्रारूप विकास आराखड्यात दर्शविण्यात आलेल्या नियोजित आरक्षणांबाबत नागरिकांना त्रुटी असल्यास हरकती नोंदविण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार संबंधित नागरिकांनी आपल्या मालमत्तेची कागदपत्रे व आराखड्याची माहिती तपासून विहित मुदतीत हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन ॲड. कुलाळ यांनी केले. अशा नागरिकांना आवश्यक असल्यास कायदेशीर सल्ला व मदत उपलब्ध करून देण्यात येईल, असे ॲड. अनिकेत अनिल कुलाळ यांनी सांगितले.

# ग्राहक आयोगाची सुनावणी आता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे

## अहिल्यानगरचा राज्यात पहिला मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** ग्राहक आयोगामध्ये वाढत्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणी प्रक्रिया ही काळाची गरज बनली आहे. वाढत्या तक्रारी आणि अपुरे मनुष्यबळ याची सांगड तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडविता येणार आहे. अहिल्यानगर जिल्हा सर्वात मोठा असून, विविध तालुक्यांतून सुनावणीसाठी येणे पक्षकार व वकिलांना काही वेळा शक्य होत नाही. भविष्यात हळूहळू फिजिकल सुनावणी कमी होऊन ऑनलाइन सुनावणीकडे सर्वांचा कल राहणार असल्याचे प्रतिपादन राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईचे अध्यक्ष मुकेश व्ही. शर्मा यांनी केले.

अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगामध्ये आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणी सेवेचा शुभारंभ राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईचे अध्यक्ष मुकेश व्ही. शर्मा यांच्या हस्ते करण्यात आला. टीव्ही सेंटर येथील प्रशासकीय इमारतीतील ग्राहक आयोगाच्या कार्यालयात कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग (मुंबई) सदस्या पूनम महर्षी, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगचे अध्यक्ष सादिक अली बशीर सय्यद, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग सदस्या चारू डोंगरे, संध्या कसबे, रजिस्ट्रार कविता कोमार, ग्राहक तक्रार निवारण आयोग वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनील मुंदडा आदींसह वकील बांधव उपस्थित होते.

पुढे बोलताना मुकेश व्ही. शर्मा म्हणाले की, महाराष्ट्रातील जिल्हास्तरावरील ग्राहक आयोगामध्ये सर्वात प्रथम आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणी प्रक्रिया घेण्याचा मान अहिल्यानगरला मिळाला आहे. अशा पद्धतीने राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये ही सुविधा सुरू करण्याचा मानस आहे. प्रास्ताविक ग्राहक तक्रार निवारण आयोग वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनील मुंदडा यांनी केले.

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग सदस्या चारू डोंगरे म्हणाल्या की, सहकारी वर्ग आणि सर्व वकिलांच्या सहकार्याने जिल्हा ग्राहक आयोगामध्ये उत्तमपणे कार्य सुरू आहे. याचा सर्वाधिक लाभ ग्रामीण भागाला होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग (मुंबई) सदस्या पूनम महर्षी म्हणाल्या की, खेड्यापाड्यांपर्यंत न्यायव्यवस्था पोहोचविण्यासाठी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम ठरणार आहे. कार्यक्रमात ज्येष्ठ वकिलांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास शहर बार असोसिएशन उपाध्यक्ष ॲड. भाऊसाहेब घुले, सेंट्रल बार असोसिएशन अध्यक्ष ॲड. फारुख शेख, सचिव ॲड. अभिजीत देशपांडे, कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. शिवाजी कराळे, ॲड. रविंद्र बेद्रे, ज्येष्ठ वकील ॲड. सुरेश लगड, ॲड. अशोक बंग, ॲड. शिरीष जोशी, ॲड. शिरीष गटने, ॲड. किशोर राऊत, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग वकील संघाचे उपाध्यक्षा ॲड. विद्या तांबोळी सदस्य गिरिजा गांधी, ॲड. योगेश कुलकर्णी, ॲड. अरुणा राशीनकर, ॲड. सुजाता कुमार, ॲड. संदीप मुळे, ॲड. शुभ्रा तांबोळी, ॲड. भावना नय्यर-आहुजा, ॲड. अंजली सरोदे, ॲड. सिद्धार्थ वाघमारे, ॲड. आदित्य घालमे, ॲड. कैवल्य उपासनी, ॲड. रणजीत टाकते, ॲड. संदीप वाघ, ॲड. फैजान बेग, ॲड. विलास कोतकर, ॲड. नितेश बनबेरु, ॲड.हरीश कल्याणी उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड. शुभांगी बाबर यांनी तर आभार ॲड. सिद्धांत गांधी यांनी मानले.

## पॉक्सो कायद्याची जनजागृती; बालकांच्या सुरक्षिततेसाठी 'स्नेह बाल आधार'ची जिल्हाभर मोहीम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** बालकांचे लैंगिक शोषण व अत्याचारापासून संरक्षण व्हावे, तसेच अशा घटनांमध्ये बालकांना तातडीने न्याय, सुरक्षा, आधार आणि विश्वास मिळावा, या उद्देशाने स्नेहालयच्या 'स्नेह बाल आधार' प्रकल्पाच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत पारनेर, श्रीरामपूर, संगमनेर, अकोले आणि शिर्डी परिसरातील विविध पोलीस ठाणे व संबंधित यंत्रणांशी संवाद साधून बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (झजउडज -लीं) संदर्भात जनजागृती करण्यात आली. बालकांवरील लैंगिक अत्याचाराची घटना घडल्यास तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया, बालकांशी संवेदनशील पद्धतीने संवाद, त्यांचे कायदेशीर हक्क तसेच उपलब्ध मदत व सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या मोहिमेत 'स्नेह बाल आधार' प्रकल्पाचे समन्वयक संतोष धर्माधिकारी, सपोर्ट पर्सन पूजा दहातोंडे व शाहीद शेख तसेच समुपदेशक सीमा माळी उपस्थित होते. टीमच्या माध्यमातून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत पॉक्सो कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, बालकांना आवश्यक आधार आणि प्रकरणांमध्ये विविध यंत्रणांमधील समन्वय याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी समन्वयक संतोष धर्माधिकारी म्हणाले, बालकांवरील लैंगिक अत्याचाराची घटना घडल्यानंतर मदत करणे महत्त्वाचे आहेच; मात्र त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे अत्याचाराची घटना घडू नये यासाठी समाजामध्ये जागरूकता निर्माण करणे. बालकाने व्यक्त केलेली भीती, अस्वस्थता किंवा एखादा अनुभव दुर्लक्षित न करता त्याचे म्हणणे संवेदनशीलतेने ऐकणे आवश्यक आहे. बालकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी केवळ पोलीस किंवा प्रशासनाची नसून पालक, शिक्षक आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीची आहे. एका बालकाचे बालपण सुरक्षित करणे म्हणजे त्याच्या संपूर्ण भविष्याला सुरक्षित दिशा देणे होय. त्यामुळे बालकांवरील अत्याचाराची माहिती मिळाल्यानंतर शांत न राहता योग्य वेळी आवाज उठवणे आणि बालकाच्या पाठीशी उभे राहणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे, असेही धर्माधिकारी यांनी सांगितले. स्नेह बाल आधारच्या माध्यमातून बालक, पालक, पोलीस, प्रशासन, शाळा आणि समाजातील विविध घटकांमध्ये समन्वय निर्माण करून बालकांना आवश्यक संरक्षण व मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. पॉक्सो कायद्याबाबतची माहिती समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून बालकांच्या सुरक्षिततेसाठी सक्षम वातावरण निर्माण करण्याचा या मोहिमेचा उद्देश आहे.

## एसपी मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहराचे ग्रामदैवत असलेल्या माळीवाडा येथील श्री विशाल गणेश मंदिर येथे गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गणेश चतुर्थी दिनी दि.१४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वा. मंदिरात जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते 'श्रीं'ची विधीवतपणे प्राणप्रतिष्ठापणा होईल. याचबरोबर १२ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड.अभय आगरकर यांनी दिली.



सोमवार दि.१४ सप्टेंबर रोजी पहाटे महापुजा, प्राणप्रतिष्ठेच्यावेळी सकाळी ९ वा. 'रुद्रवंश' ढोल पथकाची मानवंदना दिली जाईल. दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वा महिलांचे सामुहिक अथर्वशीर्ष पठण व महाआरती होईल. दि.२२ सप्टेंबर ते २४ सप्टेंबरपर्यंत वैभव अजय बोरुडे परिवाराच्यावतीने श्री गणेशयाग होणार आहे. त्याचे पौरोहित्य नाशिक येथील मुकुंदशास्त्री मुळे गुरुजी करणार आहेत तसेच दि.१४ ते १९ सप्टेंबर पर्यंत अहिल्यानगर शहरातील विविध ढोलपथक आपली वादन कला श्री विशाल गणेश मंदिर प्रांगण येथे सादर करणार आहे .तसेच शहरातील विविध भजनी मंडळ आपला भजनसंध्या कार्यक्रम सादर करणार आहे . दि.२५ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन दिनी सकाळी ८.३० वा. जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया व सौ.आशिया यांच्या हस्ते उत्थापन पुजा करण्यात येऊन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात येईल. या मिरवणुकीमध्ये सुरुवातीस सनई चौघडा, युगंधर व रुद्रनाद हे दोन ढोलपथक वादन करणार आहेत. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. भविकांच्या सोयी-सुविधांसाठी मंडप, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच यावेळी अभिषेक हॉल चे काम सुद्धा अंतिम टप्यात असल्याचेही ॲड.आगरकर यांनी सांगितले. गणेशोत्सव यशस्वीतेसाठी देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, बापुसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबिरे, हरीचंद्र गिरमे, ज्ञानेश्वर रासकर, प्रा.माणिकराव विधाते, संजय चाफे, नितिन पुंड आदिंसह श्री विशाल गणेश सेवा मंडळ व भक्तगण प्रयत्नशील आहेत.

## परंपरा गणेशोत्सवाची, संस्कृतीच्या संवर्धनाची!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** गणेशोत्सवाच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, परंपरा आणि कलात्मकतेचे जतन व्हावे, या उद्देशाने जीवनधारा महिला बचतगट बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सौ. प्रतिभाताई बबनराव पाचपुते यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही 'गौरी-गणपती सजावट स्पर्धा २०२६' आयोजित करण्यात आली आहे.




श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघातील महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या ऑनलाइन स्पर्धेला दरवर्षी मोठा प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत तब्बल ६३५२ महिला स्पर्धकांनी सहभाग नोंदविला आहे. यंदाही महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन आपल्या घरातील गौरी-गणपतीची आकर्षक सजावट स्पर्धेत सहभागी करावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.स्पर्धेतील पहिल्या पाच विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असून, विशेष म्हणजे स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना भेटवस्तू देण्यात येणार आहेत. त्यामुळे महिलांमध्ये या स्पर्धेबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.भारतीय संस्कृतीतील सण-उत्सवांची परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी महिलांचा सहभाग महत्त्वाचा असून, घराघरातील सजावटीतून संस्कृती आणि सर्जनशीलतेचा सुंदर संगम पाहायला मिळतो. या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघातील सर्व महिलांनी स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सुप्यात शिक्षण सहसंचालक श्रीराम पानझाडे यांचा शिक्षकांशी संवाद

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**सुपा :** ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेला बळ मिळावे ,त्या सक्षम होण्यासाठी प्रयत्नशील असून शिक्षणाची मुल्य रुजविन्यात शिक्षकांची भुमिका महत्वाची असल्याचे तसेच गुणवत्ता पूर्ण व दर्जेदार शिक्षण देणे करिता आम्ही कटिबद्ध आहोत अशी शपथच आम्ही घेत आहोत असे मत शिक्षण सहसंचालक डॉ.श्रीराम पानझाडे यांनी सुपा येथे शिक्षकांशी संवाद साधताना व्यक्त केले. यावेळी माऊली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिकेत पठारे यांनी ग्रामीण भागातील शिक्षण संस्थेविषयी सविस्तर चर्चा केली. पारनेर तालुका टी.डी.एफ.चे अध्यक्ष मुख्याध्यापक सुदाम दळवी व शिक्षक सोसायटीचे मा.चेअरमन दिलीप काटे, मुख्याध्यापक रमजान सय्यद यांनी शिक्षकांच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा केली.तर पारनेर तालुका कला संघटनेचे अध्यक्ष कानिफनाथ गायकवाड यांनी प्राथमिक शिक्षणा पासूनच कला शिक्षण गरजेचे असून त्यावर शासनाने योग्य उपाययोजना करावी अशी मागणी केली.तसेच पवित्र प्रणाली द्वारे कलाशिक्षक भरती सुरू केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.यावेळी माऊली शिक्षण संस्थेच्या प्राचार्या मोनिका पठारे,विज्ञान संघटनेचे तालुकाध्यक्ष सोपान गवते,शिक्षक नेते भाऊसाहेब भोगाडे,संजय दिवटे,कासार सर,दिलीप चव्हाण,काशीनाथ फंड, गोपीचंद धावडे ,दीपक थोरात,वाघे सर आदी शिक्षक उपस्थित होते.



गणेश उत्सवास सोमवार पासून सुरुवात होत असले तरी आज रविवार सुटीचा दिवस असल्याने अनेकांनी आजच घरगुती किंवा मंडळाच्या गणेश मूर्ती आजच वाजत गाजत मंडळात आणण्यात आल्या तारकपूर येथील श्रीराम मित्र मंडळाने तारकपूरचा राजाची मोदकावर विराजमान १५ फुटी भव्य गणेश मूर्ती ढोली बाजाच्या गजरात आणली हि मूर्ती बनविली स्वप्नील आर्ट्सचे प्रफुल लाटणे यांनी

(फोटोःराजू खरपुडे ,नगर)

# महिलांचे कार्य सर्वच क्षेत्रात आदर्शवत : यशवंत डांगे

## आरोग्य विभाग व आशा सेविकांकडून सात आठवड्यांत ७ हजार घरांना भेटी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहावे, यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून स्वच्छता अभियान तसेच 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात साप्ताहिक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी सादर केलेले स्वागतगीत व डेंगू जनजागृतीपर पथनाट्य नागरिकांच्या विशेष कौतुकास पात्र ठरले.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांनी घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी केली. तसेच परिसरात औषध व धूर फवारणी करण्यात आली. आरोग्य विभागातील कर्मचारी व आशा सेविकांच्या माध्यमातून 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियानांतर्गत सातव्या आठवड्यापर्यंत सुमारे ७ हजार घरांना भेटी देऊन पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली आहे. साठविलेल्या पाण्यामध्ये डेंगूच्या डासांची उत्पत्ती होऊ नये, यासाठी अबेट औषध टाकण्यात येत असून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

यावेळी बोलताना आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, अहिल्यानगरशहरातीलनागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी महापालिकेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी नागरिकांचे सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. लोकचळवळीच्या माध्यमातूनच 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान यशस्वी होऊ शकते.



पावसाळ्याच्या दिवसांत प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून परिसर स्वच्छ ठेवण्यास सुरुवात करावी. प्रत्येक घर स्वच्छ राहिल्यास संपूर्ण शहर स्वच्छ व सुंदर होण्यास वेळ लागणार नाही.

नागरिकांनी ओला व सुका कचरा वेगळा करून तो घंटागाडीतच टाकावा. काही नागरिक रस्त्यावर कचरा टाकतात. त्यामुळे साथीचे आजार पसरण्याची शक्यता निर्माण होते. नागरिकांनी कचरा रस्त्यावर न टाकता महापालिकेच्या घंटागाडीतच द्यावा, असे आवाहनही आयुक्त डांगे यांनी केले. महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वागतगीत व पथनाट्याच्या माध्यमातून डेंगू आजाराबाबत नागरिकांमध्ये जनजागृती केली. विद्यार्थिनींच्या शिस्तबद्ध व प्रभावी सादरीकरणाचे आयुक्त डांगे यांनी कौतुक केले. महिलांचे कार्य सर्वच क्षेत्रांत आदर्शवत असून महिलांकडे कोणतेही काम अचूकपणे करण्याची क्षमता असते. आज महिला सर्वच क्षेत्रांत आघाडीवर आहेत. हवाई वाहतूक क्षेत्रातही महिलांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सिंदूर युद्धामध्येही एअर फोर्सचे नेतृत्व एका महिलेने केले होते, असे आयुक्त डांगे यांनी सांगितले. महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील मुलींची शाळा पाहून आनंद झाला. विद्यार्थिनींनी शिस्तबद्ध पद्धतीने केलेले कार्यक्रमाचे सादरीकरण कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृती होत असल्याने 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान यशस्वी होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास आयुक्त यशवंत डांगे यांनी व्यक्त केला.

## महामार्गावर स्पीड ब्रेकर बसवा, अन्यथा तीव्र आंदोलन!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील मुकुंदनगर परिसरात वाहनांचा वेग वाढल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, अपघातांना आळा घालण्यासाठी तातडीने स्पीड ब्रेकर बसवावेत, अशी मागणी माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी केली आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले असून, मागणीची तातडीने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर नव्याने महानगरपालिका कार्यालयासह मुकुंदनगर परिसरात ये-जा करण्यासाठी असलेल्या प्रमुख तीन रस्त्यांवर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. महामार्गावरून वाहने अतिशय वेगाने धावत असल्याने रस्ता ओलांडताना नागरिकांना मोठ्या जीवितधोक्याचा सामना करावा लागत आहे. मुकुंदनगर हा मोठ्या लोकवस्तीचा परिसर असून, येथे २४ तास नागरिकांची ये-जा सुरू असते. विशेषतः लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांना महामार्ग ओलांडताना मोठा धोका निर्माण झाला आहे. वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना नसल्याने या ठिकाणी वारंवार अपघात होत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. या महामार्गालगत जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, पोलीस अधीक्षकांचे निवासस्थान, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय, महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय, संरक्षण मंत्रालयाचे उट-त कार्यालय, वन विभागाचे कार्यालय, गणपती मंदिर, मशीद, पेट्रोल पंप, शाळा तसेच मोठे रुग्णालय अशी महत्त्वाची ठिकाणे आहेत.

# जुन्नर लोकअदालतीत ६८२३ प्रकरणे निकाली; ४.३९ कोटींची वसूली, २३ वर्ष जुने भूसंपादन प्रकरणही निकाली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आळेफाटा : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे व तालुका विधी सेवा समिती, जुन्नर यांच्या वतीने जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, जुन्नर येथे शनिवारी दि. १२ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालत विक्रमी ठरली. या लोकअदालतीत ६८२३ प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्यात आला असून, ४ कोटी ३९ लाख २६ हजार २८७ रुपयांची वसूली करण्यात आली.



जिल्हा न्यायाधीश एस. बी. शेलार यांच्या हस्ते लोकअदालतीचे उद्घाटन झाले. यावेळी बोलताना शेलार म्हणाले की न्याय आपल्या दारी या संकल्पनेतून विधी सेवा प्राधिकरण आपल्यापर्यंत पोहोचत आहे. पक्षकारांनी लोकअदालतीच्या माध्यमातून आपली प्रकरणे निकाली काढून वेळ व पैशाची बचत करावी.

या लोकअदालतीचे वैशिष्ट्य म्हणजे जिल्हा न्यायाधीश मा. एस. बी. शेलार यांच्या न्यायालयातील २३ वर्ष जुने भूसंपादनाचे प्रकरण तडजोडीने निकाली निघाले. यामध्ये संबंधित भूधारकांना ३१ लाख रुपयांपेक्षा अधिक मोबदला मिळवून देण्यात आला.

या वेळी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ए. एम. हुसेन, सह दिवाणी व फौजदारी न्यायाधीश अनंत बाजड, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर रंजना कुंभार, बार असोसिएशनचे उपाध्यक्ष संतोष लोहके, उपाध्यक्षा निलीमा शेरकर, सचिव पुराणिक नलावडे, पॅनल सदस्या वकील वर्षा टिंगरे,शिवाजी केदार, लता वायाळ, ॲड. करमेश गाडेकर व समर्थ कॉलेज, बेल्हे येथील विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

या लोकअदालतीत ४ पॅनल कार्यरत होते. वाहन दंड, दिवाणी, फौजदारी, बँक वसुली, ग्रामपंचायत, महावितरण, पतसंस्था व फायनान्स कंपन्यांची दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. व्ही.सी. द्वारेही पक्षकार हजर झाले होते.

पोलीस विभाग, न्यायालयीन कर्मचारी, वकील संघटना, बँका व सर्व संबंधित विभागांच्या सहकार्यामुळे लोकअदालत यशस्वी झाले असून पुढील राष्ट्रीय लोकअदालत १२ डिसेंबर रोजी जुन्नर न्यायालयात होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# अजितदादांचे स्वच्छ बारामतीचे स्वप्न साकारण्यासाठी स्वच्छतेचा जागर

## विशाल जाधव मित्र परिवाराच्या वतीने स्वच्छता अभियान : अभियानाचा ३१ वा शनिवार उत्साहात..!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** आदरणीय अजितदादा पवार यांना अभिप्रेत असलेल्या स्वच्छ, सुंदर आणि निरोगी बारामतीच्या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत खासदार पार्थदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विशाल पोपटराव जाधव मित्रपरिवाराच्या वतीने दर शनिवारी स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शनिवारी ३१वा टप्पा उत्साहात पार पडला.



बारामती शहर व परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण व्हावी, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याची सवय लागावी आणि युवकांनी सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, या उद्देशाने हे अभियान सातत्याने सुरू आहे. दर शनिवारी आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमाला दिवसेंदिवस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या स्वच्छता अभियानात युवकांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत विविध वयोगटातील नागरिक सहभागी होत असून, सामाजिक बांधिलकीची भावना जपत स्वच्छतेचा संदेश दिला जात आहे. विशेष म्हणजे, अजितदादा पवार यांच्या स्वच्छ बारामतीच्या संकल्पनेला पुढे नेण्याच्या उद्देशाने विविध अकॅडमी, महाविद्यालये तसेच शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थीही मोठ्या संख्येने या अभियानात सहभागी होत आहेत.विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग ही या अभियानाची विशेष बाब ठरत आहे. शिक्षणासोबतच सामाजिक जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व समजावे आणि 'स्वच्छता ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे' हा संदेश समाजापर्यंत पोहोचावा, यासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरत आहे.

दर शनिवारी नियमितपणे राबविले जाणारे हे अभियान आता ३१व्या शनिवारापर्यंत पोहोचले असून सातत्यपूर्ण सामाजिक उपक्रमाचे उदाहरण म्हणून त्याकडे पाहिले जात आहे. केवळ एक दिवस स्वच्छता करण्यापेक्षा प्रत्येक आठवड्याला स्वच्छतेसाठी वेळ देत हा उपक्रम पुढे नेला जात असल्याने नागरिकांमध्येही त्याबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

बारामती अधिक स्वच्छ, सुंदर आणि आदर्श शहर म्हणून घडविण्यासाठी नागरिकांनीही या अभियानात सहभागी व्हावे, स्वच्छता राखावी तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता इतरांनाही स्वच्छतेसाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन विशाल पोपटराव जाधव मित्रपरिवाराच्या वतीने करण्यात आले.

'स्वच्छ बारामती'चा संकल्प केवळ घोषणेत न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा हा उपक्रम असून, युवक आणि विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग या अभियानाला निश्चितच नवी ऊर्जा देत आहे.

# गणेशमूर्तींनी सोमेश्वरनगर बाजारपेठ फुलली!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील सोमेश्वरनगर येथील करंजेपुल मुख्य बाजारपेठेत गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशमूर्तींच्या विक्रीसाठी दुकाने सजली असून, बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावर्षी सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी घराघरांत विघ्नहर्ता श्री गणरायाचे आगमन होणार आहे. गणेशमूर्ती खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू झाली असून, विविध आकर्षक रूपांतील गणेशमूर्ती बाजारपेठेत दाखल झाल्या आहेत. तीनशे रुपये पासून ते दीड हजार रुपयापर्यंत गणेश मूर्ती विक्री उपलब्ध गणेशभक्तांकडून आपल्या आवडीनुसार गणेशमूर्तींची निवड केली जात असून, मूर्ती विक्रेत्यांनीही विविध आकार व आकर्षक सजावटीच्या मूर्ती उपलब्ध करून दिल्या आहेत. गणरायाच्या आगमनाच्या तयारीमुळे सोमेश्वरनगर येथील करंजेपुल परिसरातील बाजारपेठेत चैतन्याचे वातावरण पाहायला मिळत आहे. गणपती बाप्पा मोरया! च्या जयघोषात विघ्नहर्त्या गणरायाचे स्वागत करण्यासाठी नागरिक सज्ज झाले आहेत.



# दखल

## कृषी आकृतीबंध रद्द करण्याचा निर्णय मंगळवारी

**पुणे :** कृषी विभागाचा सुधारित आकृतीबंध रद्द करण्याबाबतचा अंतिम निर्णय मंगळवारी (ता. १५) मुंबईत होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाणार आहे, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे.

कृषी विभागाचा सुधारित आकृतीबंध ११ ऑगस्ट रोजी मंजूर करण्यात आला होता. त्यामध्ये क्षेत्रीय पातळीवर काम करणाऱ्या सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांची पदे कमी करण्यात आल्याने कृषी कर्मचारी महासंघाने आक्षेप घेतला आहे. आकृतीबंध अंतिम करण्यापूर्वी कर्मचारी संवर्ग व संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा न केल्याची तक्रारही संघटनांनी केली आहे.

आकृतीबंधाचा फेरविचार करून तो रद्द करावा आणि नवीन आकृतीबंध तयार करताना कृषी कर्मचारी महासंघाला विश्वासात घेऊन समिती स्थापन करावी, अशी मागणी आहे. नवीन आकृतीबंधात खातेदारांची संख्या विचारात घेण्यात आली असली तरी भौगोलिक क्षेत्रफळ, हेक्टरनिहाय शेती क्षेत्र आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय कामाचा पुरेसा विचार झालेला नसल्याचा संघटनांचा आक्षेप आहे.

याबाबत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, की मंजूर आकृतीबंधात काही चुका झाल्या असून त्या दुरुस्त केल्या जातील. कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विरोधात आकृतीबंध केला जाणार नाही. त्यांना विश्वासात घेऊनच पुढील कार्यवाही केली जाईल. तसेच आकृतीबंधाबाबत जबाबदार असलेल्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## नगर नागरी पतसंस्थेच्या कार्यक्षेत्र वाढीस सभासदांची मंजुरी



**पुणे :** हडपसर येथील नगर नागरी सहकारी पतसंस्थेचे कार्यक्षेत्र पुणे शहर (४) ऐवजी पुणे जिल्हा करण्याच्या प्रस्तावास वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजय मोरे यांनी संस्थेला सातत्याने 'अ' वर्ग ऑडिट मिळत असून, राष्ट्रीय विकासरत्न पुरस्कारासह सन २०२५ चा शिवाजीराव भोसले आदर्श पतसंस्था पुरस्काराचे प्रथम पारितोषिक मिळाल्याचे सांगितले. संस्थेने नवीन वास्तू खरेदी केली असून, हे यश सभासदांच्या सहकार्यामुळे शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले. अहमदनगर जिल्हा मित्र मंडळ (पब्लिक ट्रस्ट), पुणेचे अध्यक्ष साहेबराव खामकर यांनी संस्थेचे कामकाज पूर्णपणे संगणकीकृत असून, स्वमालकीचे सुसज्ज प्रशासकीय कार्यालय असल्याचे सांगितले. संचालक मंडळाचे अचूक निर्णय, पारदर्शक कारभार तसेच सभासद व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे संस्थेची प्रगती होत असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेचे सचिव डॉ. प्रा. पांडुरंग गाडेकर यांनी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या ताळेबंदाचा आढावा घेत सभासदांना नऊ टक्के लाभांश देण्यात येणार असल्याचे जाहीर केले. सभेत सर्व विषयांना एकमताने मंजुरी देण्यात आली.या वेळी डॉ. केकरे, उपाध्यक्षा सुनिता कोकणे, संचालक नलिनी मोरे, गजानन वाघ, प्रा. जगताप, व्यवस्थापिका रेखा गुरव यांच्यासह संचालक व सभासद उपस्थित होते. के. एन. गाजरे यांनी आभार मानले.

## तिबेटच्या इतिहासावरील पुस्तकाचे १५ सप्टेंबरला प्रकाशन

**पुणे :** तिबेटच्या सुमारे १३०० वर्षांच्या ऐतिहासिक प्रवासाचा वेध घेणारे 'तिबेट – एक इतिहास' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मंगळवारी (दि. १५) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित करण्यात आला आहे. भूगर्भशास्त्र विभागाच्या सभागृहात सायंकाळी ४ ते ६ या वेळेत हा कार्यक्रम होणार आहे.

तिबेटविद्येचे अभ्यासक डॉ. सॅम फान शाईक यांच्या मूळ इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद डॉ. लता महेश देवकर आणि डॉ. महेश अ. देवकर यांनी केला आहे.या कार्यक्रमास निर्वासित तिबेटी संसदेचे माजी अध्यक्ष डॉ. लोब्संग सांग्ये, मध्यवर्ती तिबेटी प्रशासनाच्या आंतरराष्ट्रीय संबंध विभागाचे प्रमुख तेम्पा ग्यल-छेन झामल्हा, केंद्रीय उच्च तिब्बती शिक्षा संस्थान, सारनाथचे माजी कुलगुरू पद्मश्री गेशे नवांग सामतेन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी उपस्थित राहणार आहेत.इतिहास, संस्कृती तसेच भारत-तिबेट संबंधांचा अभ्यास करणारे विद्यार्थी, संशोधक आणि वाचकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## 'करंजे जोशीवाडीच्या दोन उत्कृष्ट क्रिकेटपटूंची जिल्हास्तरीय निवड

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुका क्रीडा स्पर्धेत सोमेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय सोमेश्वरनगरच्या १४ वर्षांखालील क्रिकेट संघाने उल्लेखनीय कामगिरी केली या स्पर्धेत करंजे येथील जोशीवाडी शाळेचे माजी विद्यार्थी प्रथमेश मोहन फरांदे व श्रेयश सुनील रामकर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत आपल्या खेळाची छाप पडली ही क्रिकेट स्पर्धा १४ वर्ष वयोगट- माळेगाव क्रीडासंकुल बारामती येथे दि ११ सप्टेंबर रोजी झाली सोमेश्वर विद्यालय सोमेश्वर नगर विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर दोन्ही विद्यार्थ्यांचे जिल्ह्यात स्तरीय क्रिकेट स्पर्धेत निवड झाली ही स्पर्धा सोमवार २८ सप्टेंबर रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस मिलिटरी स्कूल फूलगाव पुणे येथील मैदानात होणार आहे निवड बारामती तालुका क्रीडा समिती चे मान्यवर यांनी घोषित केली मार्गदर्शक योगेश महाले आणि शाळेचे प्राचार्य पी बी जगताप होते दोन्ही खेळाडूंच्या दमदार कामगिरीची दखल घेत त्यांची पुणे जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या यशामुळे करंजे जोशीवाडी गावासह सोमेश्वरनगर परिसराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे खेळामध्ये यश संपादन करण्यासाठी मेहनत सातत्य आणि जिद्द आवश्यक असते प्रथमेश फरांदे व श्रेयश रामकर यांनी आपल्या खेळातून याचा प्रत्यय दिला आहे.

# बारामतीत वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर

## बारामतीच्या वाहतूक कोंडीवर उपाययोजनांसाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन..!

### बारामतीत सिटी बस सेवा सुरू करण्याची आग्रही मागणी..!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि नागरिकांच्या दैनंदिन प्रवासातील अडचणी दूर करण्यासाठी शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रावाहिनी पवार यांना अर्ज देऊन बारामती शहरातील वाहतूक कोंडीवर प्रभावी उपाययोजना करण्यासह शहरांतर्गत 'सिटी बस सेवा' सुरू करण्याची मागणी करण्यात आली.



बारामती शहराचा गेल्या काही वर्षांत झपाट्याने विस्तार झाला असून नागरिकांची संख्या, वाहनांची संख्या तसेच शहरातील वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे शहरातील प्रमुख चौक आणि बाजारपेठांच्या परिसरात वारंवार वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. भिगवण चौक, मारवाड पेठ, गुणवडी चौक यांसह शहरातील इतर महत्त्वाच्या ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीवर चर्चा करण्यात आली. या ठिकाणी वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना, वाहतूक नियोजन, पार्किंग व्यवस्था तसेच प्रशासकीय पातळीवर करता येणाऱ्या उपायांबाबत निवेदनातून लक्ष वेधण्यात आले.बारामती शहरासोबतच लगतच्या ग्रामीण भागाचा झपाट्याने विस्तार होत असल्याने नागरिकांसाठी परवडणारी आणि सुरक्षित सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यासाठी बारामती शहरात नवी 'सिटी बस सेवा' सुरू करण्यात यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

बारामती हे शैक्षणिक आणि औद्योगिक केंद्र म्हणून विकसित झाले आहे. शहरातील शाळा, महाविद्यालये, विविध शैक्षणिक संस्था तसेच एमआयडीसी परिसरात दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी व कामगार ये-जा करतात. सिटी बस सेवा सुरू झाल्यास या वर्गाला मोठा फायदा होणार आहे. तसेच सर्वसामान्य नागरिक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना परवडणाऱ्या दरात सुरक्षित व सोयीस्कर प्रवासाचा पर्याय उपलब्ध होईल.

शहरातील वाढती वाहनांची संख्या कमी करण्यासाठी आणि वाहतूक कोंडीवर दीर्घकालीन उपाय म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे महत्त्वाचे असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**प्रशासकीय विभागांना पाहणीचे निर्देश देण्याचे आश्वासन.**

राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आलेल्या या मागण्यांची उपमुख्यमंत्री सुनेत्रावाहिनी पवार यांनी गांभीर्याने दखल घेतली. बारामती शहरातील वाहतूक कोंडीच्या ठिकाणांची तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची संबंधित प्रशासकीय विभागामार्फत तात्काळ पाहणी करून नागरिकांच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत निर्देश देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लागून नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि परवडणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध होण्यासाठी प्रशासनाकडून सकारात्मक कार्यवाही होण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# ओतूर पोलिसांचे माणुसकी दर्शन

## बस स्थानकावर दोन महिन्यांपासून एकट्या असलेल्या ७५ वर्षीय आजीची सुखरूप कुटुंबाशी भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** घरातून कोणालाही न सांगता निघून आलेल्या ७५ वर्षीय वृद्ध महिलेला ओतूर(ता. जुन्नर) पोलिसांनी माणुसकीचे दर्शन घडवत सुखरूप तिच्या कुटुंबाच्या ताब्यात दिले असल्याची माहिती ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांनी दिली. या घटनेमुळे ओतूर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.केशरबाई त्र्यंबक काळे वय ७५, रा. धनेगाव, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर असे या महिलेचे नाव आहे. त्या गेल्या दोन महिन्यांपासून ओतूर बस स्थानक येथे एकट्याच बेवारस अवस्थेत थांबल्या असल्याची माहिती सखाराम मिलखे यांनी ओतूर पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस कर्मचारी मयुरी खोसे यांना दिल्या नंतर ओतूर पोलिसांनी तातडीने बस स्थानकावर जाऊन त्यांची चौकशी केली असता, त्या कोणालाही न सांगता जामखेड येथून निघून आल्याचे समजले.



पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला आणले व त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेऊन संपर्क साधला. मात्र नातेवाईकांनी येण्याची तात्काळ सोय नसल्याचे सांगितले. त्यामुळे या आजीच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांनी त्यांना पांगरी माता येथील राजाराम पाटील आश्रम शाळेत दोन ते तीन दिवस सुरक्षित ठेवले.

अखेर दि. १३ सप्टेंबर रोजी त्यांचे पती त्र्यंबक लक्ष्मण काळे हे ओतूर पोलीस स्टेशन येथे आले. पोलिसांनी खातरजमा करून केशरबाई यांना त्यांच्या पतीच्या ताब्यात सुखरूप दिले असून यावेळी आजी सुखरूप असल्याचे बाजगीरे यांनी सांगितले.

# वळती परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ

## एका रात्रीत अनेक ठिकाणी चोरीचे प्रयत्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वळती :** वळती परिसरात एका रात्रीत अनेक ठिकाणी चोरी व चोरीचे प्रयत्न झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनाक्रम असा की, चोरट्यांनी प्रथम गांजवेवाडी येथे धनंजय तुकाराम ठाकूर यांच्या बंद घरात चोरी करून सुमारे २८ ग्रॅमचे मंगळसूत्र व १५ हजार रुपये रोख रक्कम लंपास केली. त्यानंतर चोरट्यांनी बोऱ्हाडे मळा येथील भगवान बोऱ्हाडे यांच्या घरातील कपाट उघडून नवीन कपडे चोरून नेले.त्यानंतर चोरटे गांजवेवाडी, बोऱ्हाडे मळा व जाधव मळा परिसरातून भोकरवस्तीच्या दिशेने गेल्याचे सांगण्यात येत आहे. भोकरवस्ती येथे रामदास भोर यांच्या घरात चोरीच्या उद्देशाने घर उघडण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, घरातील लोक जागे झाल्याने चोरट्यांनी तेथून पळ काढला.घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने तसेच मंचर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वाघमोडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

एका रात्रीत विविध ठिकाणी चोरीच्या घटना व चोरीचे प्रयत्न झाल्याने वळती परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास मंचर पोलीस स्टेशन करत आहे.

# बाल संरक्षण व्यवस्था बळकटीकरणासाठी राज्यस्तरीय सल्लामसलत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यातील बाल संरक्षण व्यवस्था अधिक सक्षम, प्रभावी आणि बालकेंद्री करण्याच्या उद्देशाने महिला व बाल विकास आयुक्तालयातर्फे पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात 'बाल संरक्षण प्रणाली बळकटीकरण' विषयावर राज्यस्तरीय सल्लामसलत बैठक घेण्यात आली. भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाच्या आगामी विभागीय शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस राज्यातील बाल संरक्षण व्यवस्थेशी संबंधित विविध यंत्रणांचे १९१ प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये विभागीय उपआयुक्त, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष व सदस्य, बाल न्याय मंडळाचे प्रतिनिधी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, बाल हेल्पलाइन कर्मचारी, परिविक्षा अधिकारी, बाल संगोपन संस्थांचे अधीक्षक, विशेष बाल पोलीस पथकाचे अधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी आणि राज्य दत्तक संसाधन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचा समावेश होता. राज्यभरातील महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी व कर्मचारी ऑनलाइन माध्यमातून सहभागी झाले.महिला व बाल विकास आयुक्त वर्षा लड्डा यांनी राज्यातील बाल संरक्षण व्यवस्थेचा आढावा घेत प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा, विविध यंत्रणांमधील समन्वय आणि बालकांना प्रभावी सेवा देण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज व्यक्त केली. केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाचे सहसचिव अजित कुमार यांनी अधिक मजबूत, उत्तरदायी आणि बालकेंद्री व्यवस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर मार्गदर्शन केले. बैठकीत बिगर-संस्थात्मक देखभाल व दत्तक प्रक्रिया, बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळाची कार्यक्षमता, पुनर्वसन व पश्चात-देखभाल, मिशन वात्सल्य पोर्टलद्वारे प्रकरण व्यवस्थापन तसेच विविध यंत्रणांमधील समन्वय या विषयांवर चर्चा करण्यात आली. समस्या, उपाय आणि कृती या दृष्टिकोनातून चर्चा करून प्रत्येक मुद्द्यासाठी ठोस उपाययोजना, जबाबदार यंत्रणा, कालमर्यादा आणि देखरेख व्यवस्था निश्चित करण्यावर भर देण्यात आला.बैठकीतील सूचना व कृती आराखडा आगामी राष्ट्रीय विभागीय शिखर परिषदेत सादर करण्यात येणार आहे.

# गणपती बाप्पा स्वागताची जोरदार तयारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** निघोज आणी पंचक्रोशीतील गावांत गणरायाच्या आगमनाची जोरदार तयारी सुरू झाली असून यावर्षी १२ दिवस गणपती बाप्पा थांबणार असल्याने गणेश मंडळाने फंड माध्यमातून मोठ्या प्रमाणात खर्च करण्याची तयारी ठेवली आहे. निघोज आणी परिसरातील लोकसंख्या जवळपास २० ते २५ हजार असून वाडी वस्तीवर बाप्पा येणार असल्याने २५ ते ३० गणेश मंडळांनी बाप्पांच्या स्वागतासाठी जोरदार तयारी केली आहे.

गणेश मंडळांचे मंडप उभारण्याचे काम, विद्युत रोषणाई, सजावट तसेच विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे नियोजन पुर्ण झाले आहे. गावच्या पारावर, चौकाचौकात आणि मंडळांच्या ठिकाणी यंदाचा गणेशोत्सव कसा उत्साहात साजरा करायचा, याबाबत तरुणाईमध्ये चर्चा रंगू लागली आहे. मात्र, उत्सवाचा हा आनंद कर्णकर्कश आवाज आणि ध्वनिप्रदूषणामुळे इतरांच्या त्रासाचे कारण होऊ नये, अशी भावना ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे.

गणपती बाप्पा म्हणजे गावच्या मातीशी आणि प्रत्येकाच्या श्रद्धेशी जोडलेला उत्सव. त्यामुळे गणरायाची प्रतिष्ठापना करताना भक्ती, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जपणे गरजेचे आहे. मंडळांनी बाप्पाची स्थापना करताना



तसेच आरती, भजन, कीर्तन व इतर धार्मिक कार्यक्रमांवेळी ध्वनिक्षेपकांचा वापर मर्यादित ठेवावा. रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजात डीजे, स्पीकर व ध्वनिवर्धक यंत्रणा वाजविण्याचा अट्टहास करू नये, असे आवाहन करण्यात येत आहे.

गणेशोत्सवाच्या काळात अनेक विद्यार्थी अभ्यास करत असतात. तसेच ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी व्यक्ती आणि सकाळी लवकर कामावर जाणारे नागरिक यांचाही विचार मंडळांनी करणे गरजेचे आहे. 'आपला उत्सव, आपली जबाबदारी' या भावनेतून प्रत्येक मंडळाने ध्वनिप्रदूषण टाळून गणेशोत्सव साजरा केला, तर गावातील वातावरण भक्तिमय राहण्यास मोठी मदत होणार आहे.

विशेष म्हणजे गणेश विसर्जनाच्या दिवशी मंडळांचा उत्साह शिगेला पोहोचतो. गुलाल, फटाके, डीजे आणि मोठमोठ्या स्पीकरच्या आवाजात मिरवणुका काढण्याची पद्धत अनेक ठिकाणी पाहायला मिळते. मात्र, बाप्पाला निरोप देताना आवाजाची स्पर्धा करण्यापेक्षा भक्तीचा गजर आणि पारंपरिक वाद्यांच्या तालावर मिरवणूक काढण्याला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

गावच्या जत्रा-उत्सवाला जसा सगळ्यांचा सहभाग असतो, तसाच गणेशोत्सवही सर्व समाजाला सोबत घेऊन साजरा व्हावा. मंडळांनी सामाजिक उपक्रम, रक्तदान, वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम अशा विधायक कार्यक्रमांना प्राधान्य दिल्यास गणेशोत्सवाचे सामाजिक महत्त्व आणखी वाढणार आहे. आदर्श गणेश मंडळांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती पारनेर तालुका पत्रकार संघ व राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई तसेच पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज यांनी जाहीर केले आहे. उत्कृष्ट मिरवणूक, ध्वनिप्रदूषण, मंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांची सामाजिक भुमिका, आरास, विद्युत रोषणाई, लहान मुले विद्यार्थी तसेच महिला भगीनी यांच्यासाठी स्पर्धा, तसेच गणेश मंडळ परिसरातील जनतेच्या मुलाखती घेऊन गणेश मंडळ आदर्श असल्याचा संदेश आदी बाबींचा विचार करून गणेश मंडळाला आदर्श मंडळ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

# डिंभे-माणिकडोह बोगद्याला राजकीय ग्रहण?

## कुकडी प्रकल्प महत्त्वाकांक्षी बोगदा : अण्णासाहेब हजारे यांना बाजार समितीचे सभापती लोखंडे यांचे पत्र

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** पारनेर, श्रीगोंदा, नगर, कर्जत आणि करमाळा तालुक्यांतील लाखो शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा असलेल्या डिंभे-माणिकडोह बोगद्याच्या कामावरून राजकीय संघर्षाची ठिणगी पडली आहे. या बोगद्याला यापूर्वीच तत्त्वतः मान्यता मिळालेली असताना, काम सुरू होण्याच्या टप्प्यावर राजकीय प्रतिष्ठा आणि स्वार्थासाठी अडथळे निर्माण केले जात असल्याचा गंभीर आरोप कृषी उत्पन्न बाजार समिती, श्रीगोंदाचे सभापती अतुल (प्रवीण) लक्ष्मण लोखंडे यांनी केला आहे.

यासंदर्भात त्यांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांना पत्र पाठवून या प्रश्नात लक्ष घालण्याची विनंती केली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून बोगद्याचे काम मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणीही पत्रातून करण्यात आली आहे.



पत्रात नमूद केल्यानुसार, २०१८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी डिंभे-माणिकडोह बोगद्याबाबत चर्चा झाली होती. त्यानंतर तत्कालीन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे, श्रीगोंदा तालुक्याचे तत्कालीन आ. राहुल जगताप तसेच कुकडी प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता हेमंत धुमाळ यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली होती. या बैठकीनंतर बोगद्याला तत्त्वतः मान्यता मिळविण्यात आली, असा दावा पत्रात करण्यात आला आहे. मात्र, आता पुन्हा बोगद्याच्या कामाला सुरुवात होण्याच्या हालचाली सुरू झाल्यानंतर मा. आ. दिलीप वळसे पाटील व मा. आ. विक्रम पाचपुते यांच्या अभिलिखित कराराचा दाखला देत दोघांनीही बोगद्याचा मुख्य विषय सोडून राजकीय प्रतिष्ठा व राजकीय स्वार्थाचा वापर करून कामात खोळंबा घातल्याचा आरोप पत्रातून करण्यात आला आहे.

# श्रीगोंद्यात कपाशी-मका करपली दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात यंदा पावसाने मोठी दडी मारल्याने खरीप हंगामातील कपाशी, मका यांसह विविध पिके पाण्याअभावी करपून जाण्याच्या मार्गावर आहेत. अनेक गावांमध्ये पिकांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाअभावी हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने श्रीगोंदा तालुक्यात तातडीने दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी करून दुष्काळ जाहीर करावा, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने कपाशी, मका, सोयाबीन, बाजरी आदी पिकांची लागवड केली. सुरुवातीला झालेल्या पावसामुळे पिकांना चांगली सुरुवात मिळाली. मात्र, त्यानंतर पावसाने ओढ दिल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी झाला.

परिणामी कपाशीची वाढ खुंटली असून, अनेक ठिकाणी पिके सुकू लागली आहेत. मक्याची पाने वाळून करपली असून काही शेतांमध्ये उत्पादनाची आशाच मावळली आहे.तालुक्यातील अनेक भागांत शेतकऱ्यांनी महागडे बियाणे, खते, औषधे आणि मशागतीवर खर्च केला आहे. मात्र, पिकांना पाणी मिळत नसल्याने हा संपूर्ण खर्च वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. आधीच



शेतीमालाच्या दराचा प्रश्न, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जाचा बोजा यामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता पिके वाचविण्याचे मोठे संकट उभे ठाकले आहे.शासनाने कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन परिस्थितीची पाहणी करावी. करपलेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई, पीकविमा आणि आवश्यक मदत द्यावी. तसेच तालुक्यातील परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.पावसाची आणखी काही दिवस प्रतीक्षा केल्यास उरलेली पिकेही हातातून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळकाढूपणा न करता 'पंचनामे कधी?' आणि 'मदत कधी?' या दोन प्रश्नांची तातडीने उत्तरे द्यावीत, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# शाडू मातीच्या गणेशमूर्तींतून पर्यावरण संवर्धनाचा जागर!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स तसेच राजमाता जिजाऊ इंग्लिश मिडियम स्कूल, पारनेर येथे 'पर्यावरणपूरक शाडू मातीपासून गणपती बनवा' कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या उपक्रमात सुमारे २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत स्वतःच्या हातांनी गणेशमूर्ती साकारल्या.



२५० विद्यार्थ्यांनी साकारल्या गणेशमूर्ती इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. शाडू मातीला विविध आकार देत विद्यार्थ्यांनी आकर्षक गणेशमूर्ती तयार केल्या. मातीशी प्रत्यक्ष संवाद साधताना विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कलागुणांना मुक्त वाव मिळाला. कृतीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश कार्यशाळेत शाडू मातीचे महत्त्व, गणेशमूर्ती घडविण्याची पद्धत, आकारनिर्मिती तसेच पर्यावरणपूरक सजावटीचे तंत्र याबाबत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. 'माझा गणपती, पर्यावरणपूरक गणपती' हा विचार विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

'मूर्ती घरीच विसर्जित करून झाड लावणार' कलाशिक्षक कवडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही गणपतीची मूर्ती तयार केली. मूर्तीला नैसर्गिक रंगांनी रंगवून तिची घरी प्रतिष्ठापना करणार आहोत. गणेशमूर्तीचे विसर्जनही घरीच पाण्याच्या बादलीत करून त्यातून मिळालेल्या मातीमध्ये फुलांचे झाड लावणार आहोत, असे कु. ईश्वरी बोरकर, इयत्ता सातवी 'अ' हिने सांगितले.

बॅलन्सिंग गणेशमूर्तींचा अनोखा प्रयोग सध्या मुंबईसह विविध ठिकाणी चर्चेत असलेल्या 'बॅलन्सिंग गणेशमूर्ती' बनविण्याच्या संकल्पनेचाही विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत प्रयोग केला. काही विद्यार्थ्यांनी संतुलन साधणाऱ्या गणेशमूर्ती साकारण्याचा अभिनव प्रयत्न केला. यामुळे पारंपरिक गणेशमूर्ती निर्मितीला आधुनिक कलात्मक प्रयोगाची जोड मिळाली.

विशेष म्हणजे महिला शिक्षिका श्रीमती रिमा भिंगारदिवे यांनीही विद्यार्थ्यांसोबत मातीमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेत गणेशमूर्ती साकारली. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री. कचरु शिंदे, उपप्राचार्य श्री. संतोष इंगळे, पर्यवेक्षक श्री. अजित के. दिवटे, राजमाता जिजाऊ इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका कविता गवते यांच्यासह सुशांत पंदरकर, श्रीमती पठारे, रविंद्र काळे, श्रीमती गुंड, श्रीमती ढगे, श्रीमती भिंगारदिवे, श्रीमती नरसाळे, श्रीमती शेळके, श्रीमती भोर तसेच शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी विद्यार्थ्यांनी घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद ठरला. 'भक्तीसोबत निसर्गाचीही आराधना करूया' हा संदेश देत या कार्यशाळेने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याबरोबरच सर्जनशीलतेला नवी दिशा दिली.

# प्रा. राजेंद्र नष्टे यांचा सन्मान




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** हसू अडवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र नारायण नष्टे सर यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार, पुणे २०२६ या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुणे येथील नटसम्राट निळू फुले रंगमंदिर, पिंपळे गुरव येथे रविवारी १३ सप्टेंबर रोजी झालेल्या कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्याची विविध संस्थांकडून सातत्याने दखल घेतली जात असल्याने 'पुरस्कारांचा एकामागून एक झपाटा' अशी चर्चा शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात रंगली आहे.

प्राचार्य नष्टे सरांच्या कार्यामुळे राशीनच्या शैक्षणिक क्षेत्राचे नाव महाराष्ट्राच्या नकाशावर ठळकपणे चर्चेत आले असून, त्यांच्या या यशाबद्दल शिक्षणप्रेमी, पालक, विद्यार्थी व राशींच्या नागरिकांकडून व विजय दादा देशमुख व संभाजी राजे राजेभोसले अल्लाउद्दीन काझी दिलीप नष्टे भुजंग कदम अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे शिक्षण व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पुणे शहराच्या महापौर मंजुषा दीपक नागपुरे, आमदार शंकरराव जगताप, तसेच विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

# श्रीगोंदा तालुका ठरतोय गुन्हेगारीचे माहेरघर?

## पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या बदलीनंतर पूर्णवेळ अधिकारी कधी?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची नागरिकांमध्ये चर्चा असून, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मारामाऱ्या, हल्ले, अवैध धंदे, आर्थिक फसवणुकीचे प्रकार आणि इतर गुन्हेगारी घटनांमुळे सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत पोलीस यंत्रणेला अधिक सतर्क आणि आक्रमकपणे काम करण्याची गरज असताना पोलीस ठाण्याला पूर्णवेळ पोलीस निरीक्षक कधी मिळणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

जून २०२६ मध्ये जिल्हा पोलीस दलातील फेरबदलात राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांची श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी बदली करण्यात आली होती. त्याच वेळी श्रीगोंद्याचे तत्कालीन प्रभारी किरण शिंदे यांची अन्यत्र बदली करण्यात आली होती.मात्र आता संजय ठेंगे यांच्या बदलीनंतर श्रीगोंदा पोलीस ठाण्याची धुरा पुन्हा प्रभारी अधिकाऱ्यांकडेच देण्यात आली आहे ही घुरा प्रभारीकडेच राहणार का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात



आहे. तालुक्याचा विस्तार, वाढती लोकसंख्या, महामार्ग व ग्रामीण भागातील गुन्हेगारीचे स्वरूप आणि अवैध व्यवसायांचे आव्हान पाहता केवळ प्रभारी व्यवस्थेवर पोलीस ठाण्याचा कारभार किती काळ चालणार, हा खरा प्रश्न आहे. श्रीगोंदा तालुका गुन्हेगारीचे केंद्र बनण्यापूर्वीच पोलीस प्रशासनाने परिस्थितीची गंभीर दखल घ्यावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

### 'प्रभारीराज' कधी संपणार?

पोलीस ठाणे हे नागरिकांच्या सुरक्षेचे पहिले केंद्र आहे. येथे कायमस्वरूपी आणि सक्षम पोलीस निरीक्षक असणे ही केवळ प्रशासकीय बाब नसून कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे. वारंवार प्रभारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून कारभार चालविल्यास दीर्घकालीन गुन्हेगारीविरोधी रणनीती, गुन्ह्यांचा तपास आणि अवैध धंद्यांवर सातत्यपूर्ण कारवाई यावर परिणाम होण्याची शक्यता असते.त्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यासाठी सक्षम, अनुभवी आणि कायदा-सुव्यवस्थेवर पकड असलेल्या खमक्या पोलीस निरीक्षकाची तातडीने नियुक्ती करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### अवैध धंद्यांवर कारवाईची गरज

तालुक्यातील अवैध व्यवसायांवर पोलिसांनी सातत्याने लक्ष ठेवणे गरजेचे आहे. गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक निर्माण झाला पाहिजे आणि सामान्य नागरिकांना पोलिसांवर विश्वास वाटला पाहिजे. यासाठी केवळ अधूनमधून कारवाई न करता सातत्यपूर्ण गस्त, प्रतिबंधात्मक कारवाई, संशयितांवर नजर आणि गुन्ह्यांच्या तपासाला गती देणे आवश्यक आहे.

### आता नागरिकांचा थेट सवाल

श्रीगोंदा पोलीस ठाण्याला पूर्णवेळ पोलीस निरीक्षक कधी मिळणार? 'प्रभारीराज' किती दिवस चालणार? आणि गुन्हेगारांवर वचक निर्माण करणारा खमक्या अधिकारी श्रीगोंद्याला मिळणार तरी कधी?

# द•ख•ल

## गणरायाच्या स्वागताला पावसाची हजेरी शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित

**कोरडगाव :** गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने परिसरातील जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले होते. पावसाअभावी शेतकरी, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम झाला होता. पिके करपण्याच्या मार्गावर असताना जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला होता. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची टंचाईही जाणवू लागली होती. त्यामुळे सर्वांचेच लक्ष आभाळाकडे लागले होते. कपाशी, बाजरी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन आदी खरीप पिकांना पावसाची नितांत गरज असतानाच पावसाने प्रदीर्घ विश्रांती घेतल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली होती. काही पिके अक्षरशः करपून गेली असून, उर्वरित पिकांनाही पावसाची प्रतीक्षा होती. पावसाअभावी ग्रामीण बाजारपेठेतील व्यवहारावरही परिणाम झाला होता. दरम्यान, गणरायाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी दुपारपासून परिसरात रिमझिम पावसाला सुरुवात झाली. शनिवारी रात्रीही पावसाच्या सरी सुरू राहिल्या. रविवारी पावसाचा जोर काही प्रमाणात वाढल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा आशेचे किरण दिसू लागले आहेत. पावसामुळे जमिनीतील ओलावा वाढण्यास मदत होणार असून, पिकांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे. तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी होण्याची आशा निर्माण झाली आहे. पावसामुळे ग्रामीण भागातील व्यवहारांनाही पुन्हा चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यावसायिकांकडून व्यक्त होत आहे. गणरायाच्या स्वागताला आलेल्या या पावसाने शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित केल्या असून, आता वरुणराजाने अशीच साथ कायम ठेवावी, अशी प्रार्थना शेतकरी व ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## शिक्षण विस्तार अधिकारपदी निवड स्वाती टाकळकर यांचा सत्कार




**ढोरजळगाव :** शेवगाव तालुक्यातील ढोरजळगावनेची कन्या सौ स्वाती संभाजी टाकळकर (डाके) यांची पैठण (जि.छत्रपती संभाजीनगर) येथे शिक्षण विस्तार अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल ढोरजळगाव शे, ढोरजळगाव ने, ग्रामस्थ, वृद्धेश्वर उद्योग समूह, नागेबाबा मल्टीस्टेट,व मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य बापूसाहेब पाटेकर,शेवगाव पंचायत समितीचे माजी उपसभापती देविदास पाटेकर,सरपंच बाळासाहेब कराड, वृद्धेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष महादेव पाटेकर, उपाध्यक्ष अनंता उकिरडे,माजी सरपंच गणेश कराड, राजेंद्र गिऱ्हे, देविदास सांगळे, शेषराव देशमुख, शेषराव गिऱ्हे, संभाजी फसले, , विकास देशमुख, डॉ. प्रशांत बुधवंत, कैलास देशमुख, डॉ. देविदास देशमुख, सुखदेव उकिरडे, वसंत गिऱ्हे मेजर, अरुण उकिरडे, रुस्तुम गिऱ्हे, माणिक बर्गे,आदिनाथ कराड, ड. भागचंद उकिरडे,संभाजी टाकळकर, निलेश वाकडे, चंद्रकांत गिऱ्हे,बाळासाहेब कराड,लक्ष्मण डोळस,विजय पाटेकर, योगेश महाराज देशमुख, रामभाऊ पाटेकर, संदीप गिऱ्हे, गणेश जायभाये, संतोष अकोलकर,हसन शेख, अतुल लांडे, बजरंग ठोंबळ,सुभाष उकिरडे, विजय ससाने,अविनाश महाराज जिवडे, आदीसह परीसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्वाती डाके ही पत्रकार ज्ञानेश्वर फसले यांची भाची आहे.

## आ. राजळे यांच्या निधीतून बोधेगावातील काँक्रेट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील मुख्य पेठेतील परदेशी घर ते अंदुरे मामाचे घर तसेच इसाक पठाण ते दिलीप पवार यांच्या घरापर्यंतच्या सिमेंट काँक्रेट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन नुकतेच ह.भ.प. मच्छिंद्र महाराज पवार यांचे शुभ हस्ते करण्यात आले. आमदार मोनिकाताई राजळे यांच्या स्थानिक विकास निधीतून या रस्त्याच्या कामासाठी १० लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला असून या कामी भारतीय जनता पक्षाचे तालुका उपाध्यक्ष राम केसभट यांनी बोधेगावात असणाऱ्या पेठेतील रस्त्याची आवश्यकता लक्षात घेता आमदार राजळे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला असता त्यांच्या पाठपुराव्यामुळे या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी माजी सरपंच रामजी अंधारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे रामेश्वर राठोड, ज्येष्ठ नेते अस्मानराव घोरतळे, कुंडलिकराव घोरतळे, ग्रामपंचायत सदस्य सुनील गायके, सामाजिक कार्यकर्ते बाबा पठाण,अशोक बानाईत, संभाजी खेडकर, लक्ष्मण काळे, सिताराम हुंडेकरी, निजाम सय्यद, इसाक पठाण,ठेकेदार राजाभाऊ कुसळकर, राजू गायकवाड यांच्यासह इतरही पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्यने उपस्थित होते.

## नंदकुमार झावरे पा.पतसंस्था १५ टक्के लाभांश देणार : सीताराम खिलारी

**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील मा.आ. नंदकुमार झावरे पा.पतसंस्था सभासदांना१५ टक्के लाभांश देणार असल्याचे संस्थेचे



संस्थापक चेअरमन सिताराम खिलारी पा.यांनी सांगितले. संस्थेची तेविसावी वार्षिक सभा रविवार रोजी खेळीमेळीत पार पडली. यावेळी जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल टाकळी ढोकेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक प्रवीण झावरे पा.यांचा तसेच जिल्हा मराठा संस्थेच्या ज्ञानवर्धिनी शिष्यवृत्तीसाठी पुस्तक लेखन केलेले प्रा.बाळासाहेब निवडुंगे, बाबासाहेब जाधव व अतुल सैद यांचा नंदकुमार झावरे, संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी मानकर मॅडम यांनी सभासदांना बहुमोल मार्गदर्शन केले. यावेळी व्हा.चेअरमन वसंतराव सालके, डॉ.भास्करराव झावरे, डॉ. रंगनाथ आहेर, अच्युतराव जगदाळे, सुधाकर जाधव, डॉ.भाऊसाहेब खिलारी, बाळासाहेब इघे, अनिल गांधी, मा.चेअरमन बबनराव पायमोडे, प्रा. बाळासाहेब खिलारी, बाळासाहेब निवडुंगे, बापुसाहेब रांधवन, प्रकाश गोरडे, रघुनाथ झावरे, ठकाजी दूस, शिवाजी खामकर, नारायण खिलारी, भीमराज लोंढे, बबनराव खिलारी, विश्वनाथ गोरडे, संजय कुसकर, बन्सी वाबळे, पांडुरंग गोरडे, चंद्रभान धुमाळ, भास्कर लोंढे, दिलीप उदावंत, संजय रांधवन, अशोक पाटील, ज्ञानदेव पायमोडे, गोरक्ष गोरडे, लक्ष्मण झावरे, रोहिदास झावरे, प्रा.भाऊसाहेब हिंगडे, लक्ष्मण झावरे, अनिल निवडुंगे, विनायक झावरे, अभिषेक जेजुरकर, प्रमिला इघे, शालन निवडुंगे तसेच सभासद बांधव उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.१४ सप्टेंबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## ऑनलाइन मैत्री करून लूटमार करणारी टोळी जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : मोबाईलवर ऑनलाइन मैत्री करून फिर्यादीला केडगाव लिंक रोडवर बोलावून लाकडी दांडक्याने मारहाण करत लूटमार करणाऱ्या तिघांना कोतवाली पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद केले. आरोपींकडून रोकड व क्सेस मोपेड असा सुमारे १ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील लोणी सय्यद मिर येथील रहिवासी असलेल्या फिर्यादीशी आरोपींनी मोबाईलद्वारे ऑनलाइन मैत्री केली. त्यानंतर त्याला अहिल्यानगर येथील केडगाव लिंक रोडवर बोलावण्यात आले. फिर्यादी तेथे आल्यानंतर तिघांनी संगनमत करून त्याला लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्याच्याकडील ७ हजार ५०० रुपये रोख तसेच फोन पेच्या माध्यमातून ५ हजार रुपये, अशी एकूण १२ हजार ५०० रुपयांची रक्कम बळजबरीने घेत आरोपी पसार झाले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे यश मनोज भिंगारदिवे (रा. संजयनगर, श्रीरामपूर), सिद्धांत दत्तात्रय जगताप व सुमित संजय गायकवाड (दोघे रा. रेल्वे स्टेशन, इंगळे वस्ती, अहिल्यानगर) यांचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे समोर आले. पोलिसांनी तिघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्या ताब्यातून रोकड व क्सेस मोपेड असा एकूण सुमारे १ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

# ‘पाण्याची जबाबदारी माझी, एकरी उसाचे उत्पादन वाढवा’ : ना. राधाकृष्ण विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उसाचे क्षेत्र वाढले तरच सहकारी साखर कारखान्यांच्या अर्थकारणाला भक्कम पाठबळ मिळणार आहे. पाण्याची जबाबदारी माझी, तुम्ही फक्त एकरी उसाचे उत्पादन वाढवा, असे आवाहन करतानाच, जिल्ह्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी विविध सिंचन प्रकल्पांना महायुती सरकारने मोठा निधी मंजूर केला आहे. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून गोदावरी खोऱ्यामध्ये पाणी वळविण्याच्या सर्वेक्षणाला मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या ७७ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. धनंजयराव गाडगीळ सभागृहात कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी मंत्री विखे पाटील यांनी जिल्ह्यातील पाणी प्रश्नावर सविस्तर भाष्य केले. या



सभेस माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, प्रवरा बँकेचे चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे, ट्रक वाहतूक संस्थेचे चेअरमन नंदू राठी, व्हा. चेअरमन मच्छिंद्र थेटे, सोपानराव शिरसाठ, शांतीनाथ आहेर, अण्णासाहेब कडू, कारखान्याचे कार्यकारी संचालक महेश कोनापुरे यांच्यासह सर्व संचालक आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना ना. विखे पाटील म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्यात आली आहे. डॉ. सुजय विखे पाटील आणि त्यांच्या सर्व संचालक मंडळाने अतिशय कमी कालावधीत नव्या प्रकल्पाची उभारणी केल्यामुळे यंदा चांगल्या पद्धतीने गाळप करता आले.

अशक्य ते शक्य करून दाखविण्याची ताकद ही प्रवरेत असल्यामुळेच आपल्या कारखान्याचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. कारखान्याच्या अर्थकारणाला पाठबळ मिळावे म्हणून केंद्र सरकारच्या मदतीने इथेनॉल आणि 'बायो-सीएनजी' प्रकल्प कार्यान्वित होणार असून, केंद्र सरकारच्या धोरणाप्रमाणे डॉ. विखे पाटील कारखानाही आता उपपदार्थांच्या निर्मितीला गती देईल. केंद्र सरकारने इथेनॉल संदर्भात घेतलेल्या सकारात्मक धोरणामुळेच सहकारी साखर कारखानदारी टिकू शकली. यापूर्वी कारखान्यांवरील आयकराचा बोजा कमी करून तसेच केंद्र सरकारच्या माध्यमातून कारखान्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करून व्याज माफ करण्याबाबत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांचे विशेष आभार मानले. बाहेरील उसावर फार अवलंबून राहून चालणार नाही;

त्यामुळे कार्यक्षेत्रातच एकरी उसाचे उत्पादन वाढविण्यासाठी ठोस नियोजन करावे लागणार आहे. संचालकांनी यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या थेट भेटी घेऊन त्यांना प्रोत्साहित करावे. मागील वर्षी उन्हाळ्यातही पाण्याचे आवर्तन सुरू ठेवण्यात यश आले होते. यंदाची परिस्थिती मात्र खूपच आव्हानात्मक आहे. या संकटाचाही धैर्याने सामना करून आगामी गळीत हंगाम यशस्वी करण्याचे नियोजन आपल्याला करावे लागणार आहे.

त्यामुळे कार्यक्षेत्रात कुठेही पाण्याची टंचाई भासणार नाही, अशा पद्धतीने आवर्तनाचे नियोजन जलसंपदा विभागाच्या माध्यमातून करण्याची ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील पाणी प्रश्नाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. साकळाई, कुकडी, डिंभे-माणिकडोह सिंचन प्रकल्पांना निधीची उपलब्धता झाल्यामुळे जिल्ह्याला मोठा दिलासा मिळाला आहे. प्रवरा आणि गोदावरी कालव्यांच्या नूतनीकरणालाही ५५० कोटी रुपयांची उपलब्धता करून दिली असून, त्यामुळे कालव्यांची वहन क्षमता वाढेल. दमणगंगा-गोदावरीसह विविध नदीजोड व सिंचन प्रकल्पांच्या माध्यमातून मराठवाड्यासह संबंधित भागांना पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नियोजन सुरू आहे.

या प्रकल्पांच्या सर्वेक्षणासाठी निधी मंजूर करण्यात आला असून, या कामाला प्रशासकीय मान्यताही देण्यात आली आहे. पानी वाचविणे, उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करणे आणि प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत सिंचनाचे पाणी पोहोचविणे, हेच महायुती सरकारचे प्रमुख उद्दिष्ट आहे, असे विखे पाटील यांनी स्पष्ट केले. कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील यांनी आपल्या भाषणात कारखान्याच्या वाटचालीचा सविस्तर आढावा घेऊन, भविष्यात १२ लाख मेट्रिक टन उसाच्या गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, केंद्र सरकारच्या 'गोवर्धन' योजनेच्या माध्यमातून बायो-सीएनजी प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार असल्याचे सांगितले. जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून सिंचन प्रकल्प मार्गी लागत असून, पारंपरिक कालव्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळाल्याने राहाता तालुक्यासह संपूर्ण जिल्हा दुष्काळमुक्त होईल. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या पाण्याचा उपयोग शेती उत्पादन वाढविण्यासाठी करता यावा, यासाठीच आमचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

या सभेत मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांना गती दिल्याबद्दल तसेच यशस्वी आवर्तनाचे नियोजन करून भंडारदरा, निळवंडे आणि गोदावरी लाभक्षेत्राला पाण्याचा लाभ मिळवून दिल्याबद्दल, त्यांच्या अभिनंदनाचा विशेष ठराव सर्वसाधारण सभेत एकमुखाने मंजूर करण्यात आला. विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना या सभेत एकमताने मंजुरी देण्यात आली.

## गणरायांच्या स्वागतासाठी राहुरीची बाजारपेठ फुलली

### मखर, सजावटीचे साहित्य व पूजेच्या वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांची गर्दी



राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : गणरायाच्या आगमनाला अवघा एक दिवस शिल्लक राहिल्याने राहुरी शहरातील बाजारपेठेत गणेशोत्सवाचा उत्साह ओसंडून वाहत आहे. लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी घराघरांत तयारीला वेग आला असून, गणेशमूर्तीसह मखर, सजावटीचे साहित्य, पूजेचे साहित्य आणि विविध आकर्षक वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांची संगमनेर बाजारपेठेत मोठी गर्दी होत आहे.

राहुरी शहरात गणेशमूर्तींची दुकाने सजली असून सहकुटुंब सहपरिवार नागरिक येऊन आपल्या पसंतीच्या गणरायाची निवड करण्यात मग्न आहेत. गणेशोत्सवासाठी घराची सजावट करण्याकरिता आकर्षक मखर, फुलांच्या माळा, विद्युत रोषणाई, विविध प्रकारचे पडदे, तोरणे, रंगीबेरंगी सजावटीच्या वस्तू तसेच बाप्पासाठी लागणाऱ्या पूजेच्या साहित्याला मोठी मागणी आहे. आपल्या घरातील गणरायाचे आगमन अधिक आकर्षक आणि पारंपरिक पद्धतीने व्हावे, यासाठी नागरिक विविध वस्तूंची निवड करताना दिसत आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांवरील दुकानदारांसह मोठ्या दुकानांत सकाळपासूनच ग्राहकांची वर्दळ वाढली आहे. महिला, पुरुष, युवक-युवती तसेच लहान मुलांसह अबालवृद्ध मोठ्या उत्साहाने खरेदीसाठी घराबाहेर पडत आहेत. गणेशोत्सवासाठी आवश्यक असलेल्या पूजेच्या साहित्याची यादी घेऊन अनेक कुटुंबे बाजारात दाखल होत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर फुलांना, सजावटीच्या साहित्याला तसेच पूजेच्या विविध वस्तूंना मागणी वाढली असून, बाजारपेठेत सर्वत्र गणेशोत्सवाची लगबग पाहायला मिळत आहे. आज गणरायाचे आगमन होणार असल्याने दिवसभर बाजारपेठेत आणखी गर्दी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे व्यापारी वर्गातही उत्साहाचे वातावरण असून, राहुरी शहर गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात डॉल्बी साऊंडवर बंदी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : गणेशोत्सव, गणेश विसर्जन, घटस्थापना आणि दसरा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यात डॉल्बी साऊंड सिस्टीम तसेच उच्च आवाजाच्या ध्वनीवर्धकांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. अपर जिल्हादंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ (१) अन्वये याबाबतचा आदेश जारी केला आहे. गणेशोत्सव व विसर्जन कालावधीत १४ ते २५ सप्टेंबर २०२६, तसेच दसरा कालावधीत ११ ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मिरवणुकांमध्ये डॉल्बी साऊंडचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच डॉल्बी साऊंड भाड्याने देणे, पुरवठा करणे किंवा उपलब्ध करून देण्यासही बंदी राहणार आहे. उच्च आवाजामुळे वृद्ध, रुग्ण, गर्भवती महिला, लहान मुले तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ तसेच इतर लागू कायद्यांनुसार कारवाई करण्यात येणार आहे. तातडीच्या परिस्थितीचा विचार करून हा आदेश एकतर्फी पद्धतीने लागू करण्यात आला असून, तो १४ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर २०२६ पर्यंत प्रभावी राहणार आहे.




राहुरी फॅक्टरी — सुमारे १९७०
Rahuri Factory — circa 1970

### पाच दशकांपूर्वीचा राहुरी कारखाना... जुन्या आठवणींना उजाळा

राहुरी सहकारी साखर कारखाना सुमारे पाच दशकाच्या आधीचे म्हणजे सन १९७० पूर्वीचे हे बोलके छायाचित्र खूप काही सांगून जात आहे व जुन्या आठवणींना उजाळा देत असल्याचे दिसून येत आहे. - राजेंद्र परदेशी

## चांद्यात बिबट्याची दहशत; दुचाकीस्वारावर झडप, चारचाकीलाही आडवा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**चांदा** : नेवासा तालुक्यातील चांदा येथील पुंडवाडी परिसरात बिबट्याने दुचाकीस्वारावर झडप घातल्याची घटना घडली. सुदैवाने बिबट्याची झडप अपुरी पडल्याने आनंद शिरसाट हे थोडक्यात बचावले. रविवारी दुपारी याच परिसरात बिबट्या चारचाकी वाहनासही आडवा गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आनंद शिरसाट हे नेवासा फाटा येथील वर्कशॉप बंद करून रात्री दुचाकीवरून माळीचिंचोरा मार्गे घरी जात होते. पुंडवस्ती जवळ ऊसाच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्या दुचाकीवर झडप घेतली. मात्र बिबट्याचा पंजा दुचाकीवरील कापडी पिशवीवर पडल्याने पिशवी तुटून खाली पडली. शिरसाट यांनी प्रसंगावधान राखून दुचाकी वेगाने पुढे नेल्याने त्यांचा जीव वाचला.

बिबट्याने डरकाळी फोडल्याने जवळच असलेल्या शेतकऱ्यांमध्येही घबराट पसरली. दरम्यान, रविवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास बिबट्या एका चारचाकी वाहनास आडवा गेला. या परिसरात जिल्हा परिषद शाळा असून, सुदैवाने सुट्टी असल्याने अनर्थ टळला.

वन विभागाने बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी चांगदेव पुंड यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे.

# अनुसूचित जाती-नवबौद्ध वस्त्यांच्या विकासासाठी १ कोटींचा निधी

### आ. अमोल खताळ यांनी दिली माहिती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२६-२७ अंतर्गत संगमनेर विधानसभा मतदारसंघातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये विविध विकासकामांसाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये सांस्कृतिक सभामंडप, स्मशानभूमी विकास, रस्ता मजबुतीकरण व काँक्रीटीकरणाच्या कामांचा समावेश आहे.

अशी माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली. आमदार खताळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये विविध विकासकामे करण्यासाठी मालुंजे



येथे सांस्कृतिक सभामंडप बांधण्यासाठी २० लाख रुपये, चंदनापुरी येथे सांस्कृतिक सभामंडपाच्या बांधकामासाठी २० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच धांदरफळ बुद्रुक येथे गावठाण हद्दीतील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्मशानभूमीच्या विकासासाठी १० लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे.

याशिवाय लोहारे, वडगाव लांडगा, जाखुरी, निमगाव खुर्द आणि निमज येथे अनु सूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्ती सुधारणा योजनेंतर्गत रस्ता मजबुतीकरण तसेच काँक्रीटीकरणा च्या कामांसाठी प्रत्येकी १० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. अशा प्रकारे मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी एकूण एक कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्य मंत्री सुनेत्रा पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून मंजूर झाल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले. निधी मंजूर केल्याबद्दल त्यांनी संबंधितांचे आभार मानले.

## अहिल्यानगरात चार महिने पुरेल एवढाच चारा

### १०५ गावांना १०८ टँकरने पाणीपुरवठा; २१ जलस्रोतांवर फिल्टर प्लांट उभारणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जिल्ह्यात सध्या चारा टंचाईची परिस्थिती नसली तरी जनावरांसाठी पुढील चार महिने पुरेल एवढाच चारा उपलब्ध आहे. दुष्काळाची तीव्रता वाढल्यास चारा डेपोची मागणी पुढे येण्याची शक्यता आहे.

मात्र, चारा डेपोच्या माध्यमातून भ्रष्टाचाराच्या तक्रारी येत असल्याने डेपो उभारण्याऐवजी थेट लाभार्थ्यांना डीबीटीच्या माध्यमातून मदत देण्याचा पर्याय तपासला जात आहे. तसेच जवळच्या शेतकऱ्यांकडूनच चारा उपलब्ध करून घेऊन त्याचे नियोजन करता येईल का, याचाही विचार सुरू असल्याची माहिती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. अहिल्यानगर येथे दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर टंचाई आढावा बैठक झाली.

या बैठकीला पालकमंत्री विखे पाटील, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. गेल्या २० ते २५ दिवसांपासून जिल्ह्यात पावसाचा खंड पडला असून, त्यामुळे खरीप पिके धोक्यात आली आहेत. पिकांच्या नुकसानीचा आढावा घेण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

**पाणीटंचाईची सद्य:स्थिती**

- १०५ गावांना १०८ टँकरद्वारे पाणीपुरवठा
- पाणी वापर ६० लिटरपर्यंत नियंत्रित करण्याचे आवाहन
- २१ जलस्रोतांवर फिल्टर प्लांट
- फिल्टर प्लांटसाठी साडेचार कोटींचा खर्च
- ९० ते ९५ टक्के पशुगणना पूर्ण
- पिकांच्या नुकसानीचा आढावा घेण्याच्या सूचना
- सध्या चार महिने पुरेल एवढा चारा उपलब्ध

धरणांमध्ये उपलब्ध असलेल्या पाण्याचा वापर प्राधान्याने पिण्याच्या पाण्यासाठी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत ९० ते ९५ टक्के पशुगणना पूर्ण झाल्याचेही विखे पाटील यांनी सांगितले. जिल्ह्यात सध्या १०५ गावांना १०८ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

पुढील आठवड्यात टँकरसाठी स्वतंत्र प तयार करण्यात येणार असून, त्यावर पाणीवाटपाचे वेळापत्रक, पाणी उचलण्यापासून वितरणापर्यंतची माहिती उपलब्ध होणार आहे.

ग्रामसेवक व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांची छायाचित्रेही पवर प्रसिद्ध केली जाणार असल्याने पाणीपुरवठ्यात पारदर्शकता येण्यास मदत होणार आहे. दूषित पाण्याचा धोका टाळण्यासाठी जिल्ह्यातील २१ जलस्रोतांवर फिल्टर प्लांट उभारण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी सुमारे साडेचार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्रातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयोग असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. दरम्यान, सध्या जिल्ह्यातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद आहेत. त्या युद्धपातळीवर सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याच्या टाक्याही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. सामान्य परिस्थितीत प्रत्येक व्यक्तीसाठी दररोज १३५ लिटर पाण्याची गरज गृहीत धरली जाते.

मात्र, सध्याची परिस्थिती पाहता पाणीवापर ६० लिटरपर्यंत नियंत्रित केल्यास उपलब्ध पाणी अधिक काळ टिकू शकते, असे सांगत नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन विखे पाटील यांनी केले. जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी विविध राजकीय पक्षांकडून होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा तालुकानिहाय आढावा घेऊन अहवाल तयार करण्यात आला असून, तो राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे.